www.dainikmahabharat.com | RNI No. MAHMAR/2015/64418 | jaymahabharat2015@gmail.com



आकाशदीप–१० विकेट, गिल– ४३० धावा

दैनिक

# महाभारत

संपादक – विजयकुमार वाव्हळ

५८ वर्षांनी वनवास संपवला! दुसऱ्या कसोटीत इंग्लंडचा ३३६ धावांनी पराभव

महाराष्ट्र • बीड (महाराष्ट्र) • दैनिक • मराठी • वर्ष – १० • अंक ३१५ • सोमवार दि.०७ जुलै २०२५ • किंमत २ रू. • पाने ६

छत्रपती संभाजीनगर, नागपुर, नाशिक, मुंबई, रायगड, पुणे, कोल्हापुर, अहिल्यानगर, अमरावती, ठाणे, सोलापूर, नांदेड, लातुर, धुळे, जालना, धाराशिव, मुंबई, हिंगोली, परभणी, जळगांव, वर्धा, सातारा येथुन प्रकाशित होणारे मराठवाड्यातील एकमेव दैनिक


सिंहासन खाली करो ठाकरे आ रहे है.! जय महाराष्ट्र!
संजय राऊत



छत्रपती शिवाजी महाराज, राजमाता जिजाऊ, छत्रपती संभाजी महाराजांना मूर्ख म्हणतात, कशासाठी तर हिंदी भाषेच्या सक्तीसाठी.सत्ताधाऱ्यांना लाज वाटली पाहिजे, आपण कशासाठी कोणाचे उदाहरण देतो, भाषा काय वापरतो. महापुरुषांचा अवमान करणं ही सत्ताधाऱ्यांची अधिकृत संस्कृती झाली आहे ? या सत्ताधाऱ्यांना कसली मस्ती आली.विजय वडेट्टीवार



कळव्याचं पाणी ठाण्याकडे वळवलं? कळव्यात पाण्याचा हाहाकार! ठाणे महापालिका हद्दीतील कळवा भागात पाण्याची स्थिती दिवसेंदिवस गंभीर बनत चालली आहे. कळवा पूर्व असो वा पश्चिम – दोन्हीकडे नागरिकांना अपुरा, अनियमित व मनस्ताप देणारा पाणीपुरवठा मिळतो आहे. नागरिक सातत्याने प्रशासनाचे लक्ष वेधत असले तरी ठोस उपाययोजना नाहीच.
जितेंद्र आव्हाड



पंजाब में सिर्फ़ ३ साल में शिक्षा के क्षेत्र में क्रांतिकारी बदलाव आया है ८५० बच्चों ने छएएढ पास किया, २५० ने गएए क्लियर किया और ४४ ने गएए एडवांस तक पहुँच बनाई। हर बच्चे की सफलता, हर टीचर की तपस्या का नतीजा है।
अरविंद केजरीवाल





# मराठीचा विजयी मेळावा, काँग्रेसची सावध भूमिका

केंद्र सरकारच्या त्रिभाषा सूत्राचा अवलंब करून महाराष्ट्रात पहिलीपासून मराठी भाषा शिकविण्याचा शासनादेश राज्यातील महायुती सरकारने मागे घेतला. महाराष्ट्रात पाचवीपासून हिंदी भाषा शिकवली जाते, असे असताना मुलांना ती भाषा पहिलीपासून शिकण्याची गरज काय, असा सवाल राज्यातील अनेक भाषातज्ज्ञ आणि शिक्षकांनी उपस्थित केला. त्यानंतर तिसर्या भाषेची सक्ती ही केवळ महाराष्ट्रात का, हिंदी भाषिक राज्यांमध्ये तुम्ही तिसरी भाषा कुठली देणार आहात, असा सवाल उपस्थित केला जाऊ लागला. त्यातसोबत दक्षिण भारतातील राज्यांनी पहिलीपासून हिंदी शिकवणे अमान्य केले. महाराष्ट्रात या हिंदी भाषेच्या सक्तीच्या विरोधात सगळेच विरोधी पक्ष महायुती सरकारच्या आणि विशेषत: भाजपच्या विरोधात मैदानात उतरले. सगळ्यांनीच सत्ताधार्यांना धारेवर धरले. मराठी अभ्यास केंद्राचे अध्यक्ष डॉ. दीपक पवार यांच्यासारख्या भाषा तज्ज्ञाने हिंदी भाषेची सक्ती ही भविष्यकाळात मराठी भाषेला कशी मारक आहे, हे पटवून सांगितले. मराठी शाळा टिकल्या पाहिजेत, हा समाज माध्यमांवरील लाखो मराठीप्रेमींचा समूह, अनेक मराठी प्रेमी संघटना आणि मराठी जनता सरकारच्या हिंदी लागू करण्याच्या धोरणाविरोधात संतप्त झाली होती. विशेषत: महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी हिंदी सक्तीविरोधात प्रथम राजकीय पातळीवरून सडेतोड भूमिका घेतली. त्यामुळे राज्यातील वातावरण तापू लागले. त्यानंतर उद्धव ठाकरे या लढ्यात उतरले. त्यानंतर राज्यातील सगळेच राजकीय पक्ष या मेळाव्यात सहभागी होत असताना राज्यातील काँग्रेस नेत्यांनीही सरकारच्या हिंदी सक्तीला विरोध केला.

# एलन मस्कने केली नव्या पक्षाची स्थापना

वॉशिंग्टन : वृत्तसंस्था

जगातील सर्वात श्रीमंत व्यक्ती एलन मस्क यांनी राजकारणात प्रवेश करण्याची घोषणा केली आहे. त्यांनी अमेरिका पार्टी नावाच्या पक्षाची स्थापना केली आहे. यासाठी कागदपत्रेही सादर करण्यात आली आहे. यात भारतीय वंशाचे वैभव तनेजा यांची अमेरिका पार्टीचे कोषाध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली.अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि एलन मस्क यांच्यात 'बिग, ब्युटीफुल बिल'वरून मतभेद निर्माण झाले होते. त्यामुळे मस्क यांनी अमेरिका पार्टी या पक्षाची स्थापना



केली. या पक्षाचे मुख्यालय १ रॉकर रोड, हॉथॉर्न येथे आहे. तसेच एलन मस्क हे या पक्षाचे मुख्य नेते आहेत तर वैभन तनेजा यांच्यावर कोषाध्यक्षपदाची जबाबजदारी देण्यात आली आहे.वैभव तनेजा हे ऑगस्ट २०२३ पासून टेस्लाचे सीएफओ म्हणून काम करत आहेत. टेस्लाचा विस्तार होत असताना कंपनीला नफ्याच्या कठीण आव्हानांचा सामना करावा लागत होता, त्यावेळी तनेजा यांनी कंपनीच्या अर्थ विभागाचे नेतृत्व स्वीकारले होते. त्यांनी आतापर्यंत चांगले काम केले आहे.

# महाराष्ट्रातील विद्यार्थी आणि सर्वसामान्यांना दिलासा

प्रतिज्ञापत्रांसाठी मुद्रांक शुल्क माफ, ५०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरची गरज नाही

आज सर्वत्र आषाढी एकादशीचा सोहळा संपन्न होत आहे. आषाढी एकादशी निमित्ताने संपूर्ण राज्यभरात आज अगदीच उत्साहाचे वातावरण आहे. दरम्यान आषाढी सोहळ्याच्या आधीच महाराष्ट्र राज्य सरकारने राज्यातील नागरिकांसाठी आणि विद्यार्थ्यांसाठी एक मोठा निर्णय घेतला आहे.राज्य सरकारने दोन दिवसांपूर्वी अर्थातच ०४ जुलै २०२५ रोजी राज्यातील विद्यार्थ्यांसह सर्वसामान्य नागरिकांसाठी एक मोठा दिलासादायक निर्णय घेतलेला आहे. यामुळे शाळा महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या प्रकारचे दाखले काढताना अधिकचा आर्थिक भार सहन करावा लागणार नाही.आम्ही आपणास सांगू इच्छितो की, सध्या राज्याचे पावसाळी अधिवेशन सुरू असून याच पावसाळी अधिवेशनात राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी असे जाहीर केले आहे की, आता सर्वप्रकारच्या प्रतिज्ञापत्रांसाठी लागणारे ५०० रुपयांचे मुद्रांक शुल्क माफ करण्यात आले




आहे.

ह्या कागदपत्रांसाठी सुद्धा मुद्रांक शुल्क लागणार नाही

राज्य सरकारने जाहीर केलेल्या या निर्णयामुळे राज्यातील विद्यार्थ्यांना तसेच सर्वसामान्य नागरिकांना जातपडताळणी प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला, रहिवासी प्रमाणपत्र, नॉन क्रिमिलेअर सर्टिफिकेट, राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र आदी दाखल्यांसाठी पाचशे रुपयांचा स्टॅम्प पेपर देण्याची गरज भासणार नाही.

# राज्यातील सर्व शाळा ८ आणि ९ जुलै रोजी बंद राहणार




अनुदान आणि लाभांच्या प्रलंबित मागण्या पूर्ण करण्यात सरकारकडून होत असलेल्या दिरंगाईबद्दल हजारो शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी ८ आणि ९ जुलै रोजी महाराष्ट्रातील सर्व शाळा बंद ठेवल्या आहेत.

राज्यभरात दोन दिवसांच्या शाळा बंदची दखल घेण्याचे आवाहन पालक आणि विद्यार्थ्यांना करण्यात आले आहे.अनुदानित आणि अंशतः अनुदानित शाळांच्या कर्मचाऱ्यांनी हे आंदोलन पुकारले आहे. राज्य सरकारने वारंवार आश्वासन देऊनही त्यांच्या तक्रारींचे निवारण झाले नाही, असा आरोप त्यांनी केला आहे. शाळा बंद करण्याच्या निर्णयामुळे राज्यातील शिक्षण व्यवस्था तात्पुरती विस्कळीत होण्याची शक्यता आहे.गेल्या वर्षी, अनुदानित शाळांसाठी वाढीव आर्थिक अनुदानाच्या मागणीसाठी शिक्षक आणि कर्मचाऱ्यांनी १ ऑगस्ट २०२४ पासून ७५ दिवस राज्यव्यापी निदर्शने केली. सरकारने त्यावेळी सकारात्मक प्रतिसाद दिला असला तरी, नंतर १४ ऑक्टोबर २०२४ रोजी जारी केलेल्या अधिकृत सरकारी ठरावात (जीआर) निधी वाटप करण्यात त्यांनी अपयशी ठरले, ज्यामुळे नवीन नाराजी निर्माण झाली.

१० ऑक्टोबर २०२४ रोजी तत्कालीन मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत अनुदानित शाळांना अनुदानाचा पुढील हप्ता देण्याचे आश्वासन देण्यात आले होते. तथापि, एक वर्षानंतरही मागण्या पूर्ण न झाल्याने शिक्षक संघटना पुन्हा एकदा निदर्शने करण्यास भाग पाडत आहेत.

८ आणि ९ जुलै रोजी, विविध शाळांमधील हजारो शिक्षक मुंबईच्या आझाद मैदानावर मोठ्या प्रमाणात निदर्शने करण्यासाठी एकत्र येतील आणि अनुदानित आणि अंशतः अनुदानित शाळांमधील कर्मचाऱ्यांना न्याय मिळावा

# शिंदे सेनेचे आमदार संजय गायकवाडांचे पुन्हा वादग्रस्त विधान

मुंबई (प्रतिनिधी)

हिंदीचा विषय नाही. परराज्यात गेल्यावर हिंदी भाषा तुम्ही बोलणार नाहीत का? तुम्हाला जगात टिकायचं असेल तर, सगळ्याच भाषा अवगत असायला हव्यात. छत्रपती संभाजी महाराजांनी १६ भाषा शिकल्या, ते मूर्ख होते का ? छत्रपती शिवाजी महाराज बहुभाषिक होते. ताराराणी, येसूबाई, जिजाऊ यांनी अनेक भाषा शिकल्या. ते सर्व लोक काय मूर्ख का ? असे वक्तव्य आ. संजय गायकवाड यांनी केले. गायकवाड यांनी ठाकरे बंधूंवर टीका करताना हे वादग्रस्त वक्तव्य केले आहे. त्यांच्या या वक्तव्याने नवीन वादाला तोंड फुटले आहे.

मुंबईमध्ये वरळी डोममध्ये ठाकरे बंधूंचा विजयी महोत्सव पार पडला. १९ वर्षानंतर दोन्ही बंधू एकत्र आले. मनसे आणि उद्धव सेना एका आल्याने राज्याच्या राजकारण कूस बदलण्याचा अंदाज वर्तवण्यात येत आहे. या मेळाव्यानंतर त्यावर साधक बाधक चर्चा होत आहे. टीका होत आहे. ठाकरेंवर भाजप आणि शिंदे गोटातून तिखट प्रतिक्रिया येत आहे. त्यातच टीका करताना शिंदे सेनेचे शिलेदार आमदार संजय गायकवाड यांची दाखला देताना जीभ घसरली.



त्यांच्या वक्तव्यामुळे राज्यात एकच खळबळ उडाली त्यांच्या वक्तव्यानंतर राज्यात वादाला तोंड फुटण्याची शक्यता आहे.

भाषेवरून राजकारण करणं चुकीचं आहे. जर पाकिस्तानचा दहशतवाद रोखायचा असेल तर उर्दू भाषा पण आपल्याला यायला हवी असे ते म्हणाले. लातूर येथील हाडोळती येथे ते आले होते.भाषेवरून राजकारण करणं चुकीचे असल्याचे ते म्हणाले. त्यांनी छत्रपती संभाजी महाराजांविषयी केलेल्या वक्तव्याने संतापाची उसळली आहे. ठाकरे ब्रँडवर तोंडसुख

संजय गायकवाड यांनी ठाकरे नावाचा ब्रँड राहिला नसल्याचे म्हटले आहे. असा ब्रँड असता तर बाळासाहेब ठाकरे असतानाच २८८ आमदार निवडून आले असते. त्यावेळी ७० ते ७४ जागा निवडून आल्या होत्या, असा घणाघात गायकवाड यांनी केला. त्यामुळे त्यांनी अप्रत्यक्षरित्या बाळासाहेब ठाकरे यांच्यावर पण टीका केल्याचे बोलले जात आहे.

# महादेव मुंडेंच्या खूनात वाल्मिक कराडचा हात ?

## बाळा बांगरची पोलिसांकडून तब्बल ६ तास चौकशी, जबाबही नोंदवला

बीड / प्रतिनिधी

बीडच्या परळी येथील व्यापारी महादेव मुंडे यांचा १८ महिन्यापूर्वी धारदार शस्त्राचे वार करून खून करण्यात आला होता. यात अद्याप एकही आरोपीला अटक झालेली नाही. परंतु आता सरपंच संतोष देशमुख प्रकरणातील मुख्य आरोपी वाल्मिक कराडचे बाळा विजयसिंह बांगर यांचा जबाब काल केज येथे पोलिसांनी नोंदवला असून त्या दिशेने तपास देखील सुरू केला आहे.

दोन दिवसांपूर्वी विजयसिंह बाळा बांगर यांनी पाटोदा येथे पत्रकार परिषद घेत महादेव मुंडे यांच्या खून प्रकरणात वाल्मिक कराडचा सहभाग असल्याचा गंभीर आरोप केला होता. एवढेच नाही तर महादेव मुंडे यांचं कातडं, हाड आणि रक्त आणून वाल्मिक कराडच्या समोर टेबलवर ठेवल्याचा देखील खळबळजनक दावा विजयसिंह उर्फ बाळा बांगर यांनी पत्रकार परिषदेमध्ये केला होता. संतोष देशमुख यांच्या हत्येपूर्वीच तुला एका सरपंचाच्या खुनामध्ये अडकवणार अशी वाल्मिकने फोनवरून मला धमकी दिली होती ,असा दावा बांगर यांनी केला होता. त्यानंतर महादेव मुंडे यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे यांनी बाळा बांगर यांचा जबाब पोलिसांनी नोंदवावा अशी मागणी केली होती. या पत्रकार परिषदेनंतर पोलिसांनीही तातडीने सूत्रे हलवत तब्बल ६ तास चौकशी करत बाळा बांगर यांचा जबाब नोंदवून घेतला असून आता महादेव मुंडे यांच्या खून प्रकरणाच्या तपासाला गती मिळाल्याचे दिसून येत आहे. परळीतील मृत व्यापारी महादेव मुंडे यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे यांनी प्रतिक्रिया दिली आहे.





बांगर यांचा जबाब घेऊन आरोपींना अटक करण्यात यावी कारण त्यांना आरोपी माहीत आहेत आणि त्यांची फिर्याद देखील घ्यावी.अशी माझी एस पी साहेबांना विनंती आहे त्याचबरोबर एसपी साहेबांना देखील आरोपी निष्पन्न झाले आहेत,पण ते आरोपीची पाठराखण का करत आहेत? तत्कालीन पोलीस निरीक्षक सानप यांचे देखील चौकशी करावी. अशी मागणी महादेव मुंडे यांच्या पत्नी ानेश्वरी मुंडे यांनी केली होती.

# श्री आदिनाथ बँक सभासदाना ८ % डीव्हीडंड देणार -चेअरमन सुभाष काडाप्पा

इचलकरंजी / संभाजी गुरव
(दै.महाभारत)

येथील श्री आदिनाथ को-ऑप बँक लि., इचलकरंजी या बँकेची सन २०२४-२५ सालाची ३० वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दिनांक ६ जुलै रोजी मराठा मंडळ सांस्कृतिक भवन, डी मार्ट शेजारी, तांबे माळ, इचलकरंजी येथे खेळीमेळीत पार पडली.सुरुवातीस आद्यतिर्थकर आदिनाथ भगवान व संस्थापक स्व. आप्पासो मगदूम यांचे फोटोचे पुजन व मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन होऊन सभेच्या कामकाजास सुरूवात झाली.उपस्थितांचे स्वागत संचालक श्री. श्रेणिक दादासो मगदूम यांनी केले तर श्रध्दांजली ठराव संचालक श्री. मधुकर देवाप्पा मणेरे यांनी मांडला.सभेस प्रमुख अतिथी म्हणून सहकार महर्षी कल्लाप्पाण्णा आवाडे , माजी मंत्री प्रकाश आवाडे आमदार डॉ. राहुल आवाडे आदी उपस्थित होते.तदंनतर नोटीस वाचन मुख्यकार्यकारी अधिकारी श्री. जयकुमार उपाध्ये यांनी केले. सभासदांनी सर्व विषयास एकमताने टाळयाच्या गजरात मंजूरी दिली.अध्यक्षीय भाषणात चेअरमन सुभाष आदिशा काडाप्पा यांनी ८% डिव्हीडंड जाहिर केला. तसेच आतापर्यंतचा डिव्हीडंड परतावा पाहता १ हजार रूपयाच्या शेअर्स रक्कमेवर २४४० इतका डिव्हीडंड परतावा बँकेने दिलेला आहे. त्याचबरोबर अहवाल सालातील बँकेच्या आर्थिक बाबींचा आढावा सभासदांसमोर मांडला. बँकेच्या वैशिष्ट्यामध्ये महत्वपूर्ण म्हणजे दरवेळी निवडणूक बिनविरोध होते आणि प्रत्येक वार्षिक सभेस कल्लाप्पाण्णा आवाडे आवर्जून उपस्थित असतात. त्याचप्रमाणे बँकेने अहवाल सालात १ कोटी ७९ लाख इतका ढोबळ नफा तर तरतुदी वगळून ७७ लाख ७० हजार इतका निव्वळ नफा मिळविलेला आहे.

कर्जदार सभासदांना आपली कर्ज खाती रेग्यूलर ठेवावीत असे आव्हान केले तसेच अनियमित कर्जदारावर नाईलाजास्तव कायदेशीर कारवाई करावी लागते या बाबत खेद व्यक्त केले. तसेच बँकेने आण्णासाहेब पाटील महामंडळा च्या माध्यामतून एकूण १३५ सभासदांना १८ कोटी इतके कर्ज वितरण करून अर्थसहाय्य उपलब्ध केलेले आहे. तसेच इतर ग्राहकांनी या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन केले. आम्ही ग्राहकांना मोबाईल बँकींगच्या माध्यमातून आयएमपीएस सुविधा व एटीएम क्यु आर कोड, युपीए सुविधेचा लाभ देत आहोत.

प्रमुख मार्गदर्शनामध्ये प्रकाश आवाडे यांनी स्वः आप्पासो मगदूम यांचा काळ म्हणजे संघर्षांचा काळ होता असे नमूद करून जुन्या आठवणींना उजाळा दिला कठोर शिस्त हा त्याचा स्वभाव होता म्हणुन आज बँक दिमाखाने व विश्वासाने परिसरात उभी आहे समकालीन बँकेमध्ये आदिनाथ बँकेचा सर्वोत्कृष्ठ बैंक म्हणून गौरव केला

बँकींगमधील आव्हानावरती बोलताना आज छोट्या बँकांना सायबर सेक्युरीटी तंत्रज्ञान व त्यावरील होणारा खर्च हे मोठे आव्हान असलेचे नमूद केले. तसेच यासाठी व्यवसाय वाढविणे, नफा वाढविणे व कार्यक्षम बँकींग करणे गरजेचे आहे असा बहुमोल मंत्र दिला बँकेमध्ये नविन तंत्रज्ञानामुळे गर्दी कमी झाली आहे व आजचा ग्राहक नविन सुविधा घरबसल्या बँकींग वापरणारा आहे असे नमूद केले.आण्णासाहेब पाटील महामंडळ सारखी अजून ८ महामंडळे असून त्या सर्व महामंडळाचा लाभ सभासदांसाठी सुरू करा व सभासदांचे कल्याण करा तसेच महिलांसाठी नविन योजना राबवाव्यात अशी सुचना मांडली. शेवटी बँकेच्या कामकाजाबद्दल कौतुक केले व बँकेच्या पुढील प्रगतीस शुभेच्छा दिल्या.सभेमध्ये मंचावरील उपस्थितीत मान्यवरांचा विशेष सत्कार करणेत आला.

कल्लाप्पाण्णा आवाडे प्रकाश आवाडे व नूतन आमदार डॉ राहुल आवाडे यांचा सत्कार चेअरमन काडाप्पा यांनी केला तसेच नूतन व्हा. चेअरमन म्हणून चंद्रकांत मगदूम तर नवमहाराष्ट्र सुत गिरणी येथे चेअरमन म्हणून अभयकुमार मगदूम तर संचालक म्हणून मधुकर मणेरे, शिवाजी पाटील, राजेश पाटील याची निवड झालेने त्यांचा सत्कार बँकेच्या वतीने करणेत आला तसेच श्रीकृष्ण दुध संस्था नूतन चेअरमन बाबासो रूग्गे याचा तर आदर्श ग्राहक म्हणुन श्री. बाळासाहेब गोपाळ बोंद्रे यांचा त्याचप्रमाणे आदिनाथ बँकेमधील उत्तम सेवा बजावलेने श्री जिवंधर चौगुले यांचा तसेच नूतन सीईओ जयकुमार उपाध्ये व नूतन असि सीईओ निलेश बागणे, संतोष रायनाडे यांचा व आदर्श कर्मचारी म्हणुन पंकज वसवाडे व महावीर संकाण्णा यांचा सत्कार करणेत आला. तसेच उत्कृष्ठ शाखा म्हणून शाखा माणगाव या शाखेस रक्कम रू. ११,०००/- व शिल्ड देणेत आले. तसेच पत्रकार श्री. रविंद्र पाटील व शिवाजी काळे यांचाही सत्कार करणेत आला

शेवटी व्हा. चेअरमन चंद्रकांत मगदूम यांनी सर्व विषयास सभसदाणी मंजूरी दिल्याने सर्वांचे आभार मानले. सदर सभेस संचालक बाळासाहेब चौगुले, कुंतिलालजी पाटणी, अभयकुमार मगदूम, सुदर्शन खोत, अनिल बम्मण्णावर, संपत कांबळे गुरूनाथ हेरवाडे, सुचित हेरवाडे, तसेच संचालिका सौ. मंगल देवमोरे, सौ. अनिता चौगुले, बीओएम सदस्य उमेश कोळी, ॲड. पवनकुमार उपाध्ये तसेच माजी चेअरमन श्री बाळासो सिध्दाप्पा चौगुले, डॉ. पारीसा बडबडे, शंकर हजारे, चवगोंडा लडगे, सतिश मगदूम तसेच सभासद दादासो मगदूम, शांतीनाथ मगदूम, मोहन चौगुले, महावीर बरगाले, शामराव नकाते, मिलीद कोले, आर. के. पाटील, महावीर कोल्हापुरे, प्रकाश चौगुले उपस्थित होते.सभेचे सुत्रसंचालन श्री. तिर्थकर माणगांवे यांनी केले.

## शरद इन्स्टिट्युटच्या ५ विद्यार्थ्यांची एक्स्परेट कंपनीत निवड

इचलकरंजी / संभाजी गुरव
(दैनिक महाभारत)


येथील शरद इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी, कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमधील ५ विद्यार्थ्यांची एक्स्परेट लि. या आंतरराष्ट्रीय नामांकित कंपनीत निवड झाली आहे. यामध्ये कॉम्प्युटर सायन्स ॲण्ड इंजिनिअरिंग विभागातील संकेत सावंत, सृष्टी पाटील, ऋतुजा पाटील, रुनमयी झांबरे, तौफिक बाडकर या विद्यार्थ्यांची निवड झाली.एक्स्परेट ही यूके आधारित सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट कंपनी आहे. ज्याची कार्यालये यूके आणि भारतात आहेत. कंपनी पूर्ण डिझाइन आणि डेव्हलपमेंट सेवेपासून ते अल्पकालीन प्रकल्पांपर्यंत सर्व काही ऑफर करते. त्यामध्ये नवीन सॉफ्टवेअर तयार करणे आणि सध्याच्या सॉफ्टवेअरमध्ये बदल करणे. कंपनीला आवश्यकतेनुसार विकासकांची टीम पुरवणे. दीर्घकालीन विकास कार्यासाठी आउटसोर्सिंग सेवा पुरवणे.

महाविद्यालयाकडून विद्यार्थ्यांसाठी स्पेशल ॲप्टीट्युड ट्रेनिंग, टेक्निकल स्कीलचे वेगळे प्रशिक्षण तसेच मॉक इंटरव्हु यासह टेक्निकल सेशन, व्हॅल्यू ॲडेड प्रोग्रॅम, कंपनी स्पेसीपीक ट्रेनिंग, अद्यावत तंत्रज्ञानाबाबत कंपनीतील व इंडस्ट्री क्षेत्रातील तंज्ञामार्फत मार्गदर्शन यासह विविध उपक्रम राबविले जातात. प्रोजेक्ट बेस लर्निंग अंतर्गत विद्यार्थ्यांना दुस-या वर्षापासूनच प्रोजेक्ट दिला जातो. तसेच तृतीय वर्षापासूनच ॲप्टीट्युड ट्रेनिंग, कोडींग लँग्वेज स्कील याचे प्रशिक्षण दिले जाते. प्रशिक्षणासोबत भरपूर प्रात्यक्षिक करुन घेतल्याचा फायदा या कंपनीच्या इंटरव्ह्युवेळी झाला.निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे संस्थेचे चेअरमन आमदार डॉ. राजेंद्र पाटील यड्रावकर, एक्झिक्युटीव्ह डायरेक्टर अनिल बागणे यांनी अभिनंदन केले. ट्रेनिंग ॲण्ड प्लेसमेंट सेलचे प्रा. नेहा प्रसून यांच्यासह सर्व डिन, विभागप्रमुख, शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

## इनरव्हील क्लब ऑफ इचलकरंजीच्या अध्यक्षपदी सौ विभा पाटणी व सचिव पदी सौ माधुरी लाहोटी यांची निवड

इचलकरंजी / संभाजी गुरव
( दैनिक महाभारत)

येथील इनरव्हील क्लब ऑफ इचलकरंजीच्या सन २००० -२५ २६ वर्षाकरिता अध्यक्षपदी सौ . विभा सुनील पाटणी, सेक्रेटरी पदी सौ. माधुरी लाहोटी व खजिनदारपदी सौ .इशा खंडेलवाल यांची एकमताने निवड करण्यात आली. मावळत्या अध्यक्षा सौ. चंदा कोठारी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत ही निवड करण्यात आली.





यामध्ये इतर संचालक पुढीलप्रमाणे व्हाईस प्रेसिडेंट सौ .मुग्धा शहा, जॉइंट सेक्रेटरी सो. अर्चना मानधना क्लब आय एस ओ. सौ. ज्योती डागा, बुलेटीन एडिटर सौ. शशी सिंघवी, पास्ट प्रेसिडेंट सौ चंदा कोठारी तसेच कार्यकारणी मध्ये इतर सदस्य सौ . रेखा सारडा सौ. सोनू जैन, सौ .मनाली मुनोत, सौ शुभांगी माळी ,सौ .माधुरी बागडी, सौ प्रेमलता सारडा ,सौ .उमा मुंदडा , सौ .राखी बांगड, सौ. पल्लवी शहा, सौ रेखा जाजू, सपना शहा ,यांची कार्यकारणी मध्ये निवड झाली आहे .

या नवनिर्वाचित कार्यकारणीचा पदग्रहण समारंभ ७ जुलै २०२५ रोजी सायंकाळी ४.००वाजता रोटरी श्रीमती सोनीदेवी रामबिलास बाहेती सेवा केंद्र, दाते मळा इचलकरंजी ठिकाणी पास्ट डिस्ट्रिक्ट चेअरमन सौ. ज्योती मडिमन ( हुबळी )यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित केला आहे.

## कल्लाप्पाण्णा आवाडेदादांच्या ९४ व्या वाढदिवसानिमित्त विविध कार्यक्रम

इचलकरंजी/संभाजी गुरव
(दैनिक महाभारत)




हुपरी येथील कल्लाप्पाण्णा आवाडे जवाहर शेतकरी सहकारी साखर कारखान्याचे संस्थापक चेअरमन सहकार महर्षि कल्लाप्पाण्णा आवाडे (दादा) यांच्या ९४ व्या वाढदिवसानिमित्त कारखाना कार्यस्थळावर रक्तदान शिबीर, वृक्षारोपण, इयत्ता १० वी आणि १२ वी परिक्षेमध्ये ७५ टक्केपेक्षा जादा गुण मिळविलेल्या कर्मचार्यांच्या मुला-मुलींना कारखाना व कामगार संघटनेच्यावतीने शिष्यवृत्ती वाटप आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. हे सर्व कार्यक्रम माजी वस्त्रोद्योग मंत्री प्रकाश आवाडे, आमदार राहुल आवाडे, कारखान्याचे व्हाईस चेअरमन बाबासो चौगुले, सर्व संचालक आणि कार्यकारी संचालक मनोहर जोशी, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचे केंद्र संचालक सचिन खराडे यांच्या हस्ते पार पडले.

यावेळी कामगार कल्याण अधिकारी सचिन खराडे यांनी, सहकार महर्षि आवाडेदादांनी भविष्याची गरज ओळखून शिक्षणाचे महत्व समाजाला पटवून दिले. भागातील जास्तीत जास्त मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचा प्रयत्न केला. महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळामार्फत जवाहरच्या कर्मचार्यांना व त्यांच्या पाल्यांना जास्तीत जास्त शिष्यवृत्ती मिळवून देण्यात कारखाना आघाडीवर आहे. त्यातून अनेक मुलांना शिक्षणासाठी मदत होत आहेच, पण कारखाना व कामगार संघटनासुध्दा शिक्षणासाठी हातभार लावत आहे. कामगारांच्या मुलांनी पुढील इंजिनियरींग, मेडीकल व परदेशी शिक्षणासाठी शिष्यवृती तसेच महाराष्ट्र कामगार मंडळाकडून राबविण्यात येणार्या इतर सर्व योजना व उपक्रमांचा लाभ जवाहर कामगार संघटनेच्या प्रयत्नातून मिळवून देण्यात आल्याचे सांगितले.

संचालक तथा माजी मंत्री प्रकाश आवाडे यांनी अध्यक्षीय भाषणात जवाहर कारखाना नेहमी कर्मचार्यांसाठी ज्या योजना असतील त्या सुरूवातीपासून दादांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आघाडीवर आहे. कारखान्याची जडणघडण व प्रगतीमध्ये कामगारांचा वाटा मोलाचा आहे. त्यासाठी कारखान्याची कामगार संघटना सदैव प्रयत्नशील असते. कारखाना व्यवस्थापनाचे व संघटनेचे संबंध सौहार्दपूर्ण असल्याने कारखान्याने आतापर्यंतचे ३२ गाळप हंगाम यशस्वीपणे पार पडलेले असल्याचे सांगितले.

यावेळी कारखाना आणि कामगार संघटना यांच्यावतीने कल्लाप्पाण्णा आवाडेदादा यांना ९४ व्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देऊन सत्कार करण्यात आला. त्याचबरोबर प्रकाश आवाडे यांची महाराष्ट्र कर्नाटक सीमा प्रश्नाच्या उच्चस्तरीय समिती सदस्यपदी निवड झाल्याबद्दल, आमदार राहुल आवाडे तसेच दि शुगर टेक्नॉलॉजिस्टस् असोसिएशन ऑफ इंडिया नवी दिल्ली या संस्थेकडून जीवन गौरव पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल कारखान्याचे कार्यकारी संचालक मनोहर जोशी यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी ३३ व्या हंगामाकरीता कारखान्यातील मिल रोलरचे पूजन करण्यात आले. तसेच कारखाना कार्यस्थळावर वृक्षारोपण, कामगारांसाठी हाफपीच क्रिकेट स्पर्धा घेण्यात आल्या. तसेच तुलशी ब्लड बँक जयसिंगपूर व लायन्स ब्लड बँक इचलकरंजी यांचे सहकार्याने आवाडेदादांच्या ९४ व्या वाढदिवसानिमित्त घेतलेल्या रक्तदान शिबीरामध्ये ९४ रक्तदात्यांनी रक्तदान केले. प्रास्ताविक जवाहर साखर कामगार संघटनेचे अध्यक्ष सर्जेराव हळदकर यांनी केले. आभार सदस्य सुरेश पोवार यांनी मानले. सूत्रसंचालन आण्णासो गिरीबुवा यांनी केले.



## आषाढी एकादशीनिमित्त सी.डी. देवरे विद्यालयात सांस्कृतिक उत्सवाचा भक्तिरसात न्हालेला क्षण

### गरजू विद्यार्थ्यांना मदतीचा हात देत शिक्षक व माजी विद्यार्थ्यांचा स्तुत्य उपक्रम

धुळे / उमाकांत अहिरराव
(दै.महाभारत)

साक्री तालुक्यातील म्हसदी हिंदू धर्मातील एक पवित्र व श्रद्धेचा दिवस असलेल्या आषाढी एकादशीच्या पूर्व संध्येस म्हसदी येथील सी.डी. देवरे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाले.

या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर यांचे अभंग, संतांचे विचार, गीते यांची सादरीकरणे केली. पारंपरिक वारकरी पोशाख, टाळ, चिपळ्या, लेझीमच्या साथीत वाजतगाजत दिंडीप्रमाणे पालखी मिरवणूक काढण्यात आली. गावातील महिलांनी विठ्ठल-रुक्मिणीच्या मूर्तीची भक्तीभावाने पूजा केली.शाळेतील सामाजिक बांधिलकी जपत, दत्तक पालक योजनेअंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बळ व पालकपरीत विद्यार्थ्यांना गणवेश, वह्या, शालेय साहित्य देण्यात आले. हे वाटप माजी विद्यार्थी कवी सागर शिंदे व राजधर देसले यांच्या हस्ते करण्यात आले.तसेच सांस्कृतिक कार्यक्रम सादर करणाऱ्या विद्यार्थ्यांना शिवसेना उपजिल्हाप्रमुख राजधर देसले यांनी वही बक्षीस म्हणून दिल्या, तर कवी सागर शिंदे यांनी गरजू विद्यार्थ्यांना शालेय गणवेश दिले.या कार्यक्रमात प्रमुख उपस्थितीत विद्यालयाचे प्राचार्य एस. ए. देवरे, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष विनायक देवरे, सुभान पिंजारी, दिलीप देवरे, रामराव हयाळीस, ह.भ.प. सतीलाल महाराज, माजी शिक्षक एन.टी. बोरसे, तसेच गावातील नागरिक व पालक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.कार्यक्रमानंतर सर्व उपस्थितांना राजगीराच्या लाडूंचे वाटप करण्यात आले.या प्रेरणादायी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्राचार्य सतिष देवरे यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेतील सर्व शिक्षक व कर्मचारीवर्ग यांनी मेहनत घेतली.



## बेधडक

### 'ठाकरे बंधू' गर्जना....!

नवविचाराने एकत्र गर्जना करत
ठाकरे बंधू समीकरणे जुळवणार?
राजधर्म-बंधू प्रेम आळवत
स्वपक्षा
-सह राज्याचं भलं करणार..?

प्रश्न तर प्रत्येकाच्या मनात
निर्माण झाले असणार,
उत्तर मात्र होऊ घातलेल्या
नगरपालिका निकालच देणार..!



-प्रा.एस खंडागळे
पाटोदा (बीड)
मो.९६५७२८४४४४

दैनिक जय महाभारत संपादक - विजयकुमार वाव्हळ
हे पत्र, मुद्रक, प्रकाशक व मालक विजयकुमार सुखदेव वाव्हळ यांनी सुयोग ऑफसेट प्रिंटर्स येथे छापुन निर्मिती प्रिंटस् कबाड गल्ली, जुन्या पोलीस स्टेशन समोर, बीड ४३११२२ येथुन प्रकाशित केले.
संपादक - विजयकुमार वाव्हळ Mo.9028429999 / 9657299999 :: कार्यकारी संपादक ::प्रथमेश विजयकुमार वाव्हळ Mo.9075409999
RNI.NO.MAHMAR/2015/64418 मुख्य कार्यालय :- प्रथमेश गॅस एजन्सी, पहिला मजला गेवराई - बीड रोड गेवराई ता.गेवराई जि. बीड - ४३११२७
संपर्क -Mo.9403825700/94058 17999 jaymahabharat2015@gmail.com ※ टीप : या अंकातील प्रसिध्द झालेल्या प्रत्येक बातमीशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

### महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेचा कंपन्यांच्या खाजगी करणाविरोधात

# केंद्र व राज्यसरकार विरोधात देशव्यापी संप

केज/सुमित मोरे
(दै, महाभारत )

महाराष्ट्र राज्य मागास वर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेच्या संलग्न स्वतंत्र मजदूर युनीयन वतीने बुधवारी दि.०९ जुलै रोजी केंद्र व राज्य सरकारच्या विरोधात जे कंपन्यांचे खाजगी करण चालू आहे त्या विरोधात देशव्यापी संप पुकारण्यात आला आहे या संपात केज तालुका महाराष्ट्र राज्य मागास वर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेच्या सर्व सहकाऱ्यांनी, सदस्यांनी व पदाधिकाऱ्यांनी तसेच सक्रिय कार्यकर्त्यांनी सहभागी होऊन संप यशस्वी करावा असे आवाहन केज तालुका अध्यक्ष शिवाजी घुले यांनी केले आहे.सदरील संप विद्युत विभागातील सरकारी वीज कंपन्यांचे खाजगी करण करण्याच्या केंद्र व राज्य सरकारच्या धोरणा विरोधात आहे. हा संप बहुजनांचे संविधानिक हक्क कायम ठेवण्या साठी होत आहे,हा संप सरकार संविधान विरोधी कायदा आणत असल्यामुळे कर्मचाऱ्यांच्या न्याय मागण्यासाठी होत आहे,तसेच वीज ग्राहकांच्या हितास्तव होत आहे,येणाऱ्या पिढ्यांच्या शासकीय नोकऱ्या अस्तित्वात राहाव्यात म्हणून होत आहे, शासकीय वीज कंपन्यांचे अस्तित्व अबाधित राहावे म्हणून होत आहे.तसेच इतर प्रमुख मागण्या देखील करण्यात आल्या आहेत कर्मचारी भरती तीन वर्षाकरिता कंत्राटी पद्धतीने न भरता स्थायी स्वरूपात करण्यात येईल,तसेच मागासवर्गीय कर्मचाऱ्यांना खुल्या प्रवर्गासह आरक्षित प्रवर्गातून पदोन्नतीमध्ये आरक्षण त्वरित लागू करावी अशी मागणी यामध्ये लावून धरण्यात येणार आहे.दि.९ जुलै २०२५ रोजी बुधवारचा देशव्यापी संप १०० टक्के यशस्वी करावा असे आवाहन संजय मोरे सरचिटणीस महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटना यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## वनसगाव ला शाळा व विद्यालयात

# आषाढी वारी दिंडी सोहळा साजरा



निफाड ।रामभाऊ आवारे
(दै. महाभारत)

आय एस ओ मानांकन प्राप्त आदर्श, जि.प. सेमी इंग्रजी प्राथमिक विद्या मंदिर वनसगाव व छत्रपती शिवाजी विद्यालय वनसगाव ता.निफाड जि.नाशिक यांचे संयुक्त विद्यमाने आषाढी एकादशीनिमित्त आषाढी वारी दिंडी सोहळा साजरा करण्यात आला. शाळेतील विद्यार्थी ,व विद्यार्थीनी वारक-यांच्या वेशभूषेत आली होती. प्रथम विणेकरी विद्यार्थी व वारकरी विठू माऊलींच्या प्रतिमेचे पूजन अध्यक्ष बापूसाहेब यशवंत शिंदे यांचे हस्ते करण्यात आले विठू माऊलींच्या, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांच्या जयघोषात दिंडी सोहळा शालेय प्रांगणापासून संपूर्ण गावातून हनुमान मंदिर चौकात आली.तेथे प्रांगणात रिंगण सोहळा करण्यात आला.दिंडीसोहळ्यास.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी छत्रपती शिवाजी विद्यालयाचे मुख्याध्यापक चिंधु रोटे सर,शिक्षक गायकवाड सर ,वनसे सर, अहिरे सर,व सर्व शिक्षकवृंद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक आनंदा राजगुरू सर शिक्षक राजेंद्र कापडणीस सर, दिपक माहेवार सर, समाधान पवार सर ,समाधान पवार सर व शुभांगी देशमुख मॅडम ,जयश्री जाधव /शिंदे मॅडम , वारकरी शिक्षण संस्थेचे ह.भ.प निवृत्ती महाराज रायते यांनी नियोजन केले.दिंडी सोहळ्यासाठी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष बापूसाहेब यशवंत शिंदे, पोलीस पाटील / शालेय व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष संतोष अस्वले ,वारकरी शिक्षण संस्थेतील विद्यार्थी, ह.भ.प.निवृत्ती महाराज रायते, ह.भ.प ओमकार महाराज रायते,शा.व्य.स.सदस्य संजय शिंदे, संदिप डुंबरे,माजी अध्यक्ष योगेश शिंदे, सुभाष जाधव, सुनिता शेले ,भरत आवारे, अंगणवाडी सेविका सुवर्णा शिंदे, सविता घाडगे, एकनाथ शिंदे, शिवाजी शिंदे, सुनिल शिंदे,ज्ञानेश्वर शिंदे, अरुण शिंदे, एकनाथ शिंदे, व बहुसंख्य गावातील ग्रामस्थ उपस्थित होते.भजनी मंडळ यांचे सहकार्य लाभले. प्राचार्य सी डी रोटे सर व मुख्याध्यापक आनंदा राजगुरू यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## अवैधरित्या देशी दारू विक्री करताना रंगेहात पकडले ऑपरेशन फ्लॅश आउटच्या अंमलबजावणीची दहशत

माहूर (दै. महाभारत)

दारू विक्री करताना आरोपीस रंगेहात केली अटक पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप पोलीस अधीक्षक अविनाश कुमार यांच्या आदेशाने नांदेड जिल्ह्यात सुरू असलेल्या ऑपरेशन फ्लॅश आउट अंतर्गत पोलीस निरीक्षक गणेश कराड यांनी माहूर तालुक्यातील मौजे रूई येथे देशी दारू च्या बाटल्या अवैधरित्या विक्री करत असलेल्या आरोपीस रंगेहात पकडून अटक केल्याची घटना दि ५ रोजी सकाळी १० वाजता घडली आहे पोलीस निरीक्षक गणेश कराड यांनी आपरेशन फ्लॅश आऊट ची अंमलबजावणी दणक्यात सुरू केल्याने गेल्या आठवड्याभरात अनेक गुन्हे दाखल झाले असून आरोपीना रंगेहाथ पकडून न्यायालयीन कोठडीत पाठविण्यात आले आहे तर लाखो रुपयांचा मुद्देमाल ही जप्त करण्यात आलेला आहे मौजे रुई येथे दि ४ रोजी पोलीस निरीक्षक गणेश कराड यांनी शांतता बैठक घेऊन नागरिकांना अवैध धंदे करू नका व्यसनापासून दूर राहा असे सविस्तर मार्गदर्शन केले होते परंतु दुसऱ्याच दिवशी येथील संजू लोट नावाच्या व्यक्तीने देशी दारूचे ४२ बॉटल घेऊन विक्री करत असताना त्यास रंगे हात पकडले



अवैध व्यवसाय करणाऱ्या नागरिकांनी आपले अवैध व्यवसाय तत्काळ बंद करून वाईट व्यसनाच्या आहारी गेल्याने नागरिकात होणारे तंटे वाढवू नयेत तालुक्यातील कुठल्याही गावातील एकही महिला नवऱ्याने दारू पिऊन मारले अशी तक्रार घेऊन आल्यास किंवा अवैधरित्या दारू विक्री होत असल्याची तक्रार आल्यास त्यांना सुंदरीचा महाप्रसाद भेटेल आणि कडक कायदेशीर कारवाईला सामोरे जावे लागेल असा इशारा यावेळी पोलीस निरीक्षक गणेश कराड यांनी दिला आहे या कारवाईत पोहे का आशिष डगवाल पोहेका चालक प्रशांत भोपळे पो का ज्ञानेश्वर खंदाडे पो का पवन राऊत शिल्पा राठोड क्रांती राठोड गजानन जाधव होमगार्ड सलमान मजीद खान यांनी परिश्रम घेतले.

## शासनाकडून उत्कृष्टतेची पावती उपविभागीय अधिकारी पर्वणी पाटील यांचा सन्मान

ब्रम्हपुरी/प्रतिनिधी
(दै.महाभारत)

१०० दिवसांची कार्यालयीन सुधारणा विशेष मोहिम ही महाराष्ट्र शासनाच्या वतीने संपूर्ण राज्यातील शासकीय यंत्रणांमध्ये कार्यक्षमतेत सुधारणा व पारदर्शकता आणण्यासाठी राबविण्यात आली. राज्यभरातील एकूण १२,५०० शासकीय कार्यालयांमध्ये ही मोहिम यशस्वीपणे पार पडली.



या विशेष मोहिमेत नागपूर विभागातून उपविभागीय अधिकारी, ब्रह्मपुरी हे कार्यालय द्वितीय क्रमांकाने निवडले गेले असून, त्यांच्या कार्यक्षमतेची राज्यस्तरावर नोंद घेत त्यांना चंद्रपूर येथे प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला आहे.प्रशस्तीपत्र प्रदान करताना चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री मा. अशोक उईके, जिल्हाधिकारी मा. विनय गौडा, तसेच इतर मान्यवर अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमात ब्रम्हपुरी उपविभागीय कार्यालयाच्या कार्यपद्धतीचे आणि नवाचारांचे कौतुक करण्यात आले.

या यशाचे श्रेय उपविभागीय अधिकारी श्रीमती पर्वणी हर्षा रविंद्र पाटील व त्यांच्या कार्यालयीन चमूला दिले जात असून, त्यांनी अत्यंत कुशलतेने प्रशासनात कार्यक्षम सुधारणा राबवून उपविभागीय पातळीवर नवा आदर्श निर्माण केला आहे. त्यांच्या कार्यालयाने नागरिकाभिमुख सेवांचा वेग, गुणवत्तापूर्ण सेवा वितरण व डिजिटल प्रक्रियांचा प्रभावी वापर या बाबतीत उत्कृष्ट कामगिरी बजावली.या प्रशस्तीपत्राद्वारे शासनाने त्यांच्या कार्याचा गौरव करत, इतर शासकीय कार्यालयांसाठी प्रेरणादायक उदाहरण ठरले असल्याचे स्पष्ट केले आहे.उपविभागीय अधिकारी कार्यालय, ब्रह्मपुरी यांच्या या यशाबद्दल परिसरातून कौतुकाचा वर्षाव होत असून, यामुळे शासकीय सेवा अधिक गतिमान व उत्तरदायी होण्यास चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

## मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या उपक्रमात सारडगाव ची जिल्हा परिषद

# शाळा तालुक्यात प्रथम

परळी / विकास वाघमारे
(दै. महाभारत)

तालुक्यातील ग्रामीण भागातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत नवनविन उपक्रम राबविण्यात येतात तसेच शाळेतील शिक्षक मेहनत घेऊन दर्जेदार अध्यापन करतात,शालेय परिसर स्वच्छ ठेवतात.मुलांना शिक्षणासाठी गोडी लावतात.शाळेतील शिक्षक रूकमे सर,गणगोपालवाड सर,सुतार सर, फड सर,कुसंगे सर,गाडे मॅडम, केदार मॅडम शाळेचे मुख्याध्यापक मामीलवाड सर यांच्या अथक प्रयत्नातून मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या उपक्रमात सारडगाव




जि.प.शाळेस प्रथम क्रमांक (तीन लाख रुपयांचे) बक्षीस मिळाले आहे. त्याबद्दल जि.प.सदस्य प्रा.डॉ.मधुकर अघाव सर यांनी शिक्षकांचे विशेष कौतुक केले आहे.गावातील सरपंच-राजाभाऊ अघाव,उपसरपंच-भगवान आंधळे,शाळा व्यवस्थापन अध्यक्ष- दत्तात्रय गोलेर तसेच गावकरी, यांचे सहकार्य मिळाले.विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेविषयी पालकांनीही शिक्षकांचे तोंडभरून कौतुक केले आहे.

## युनिटी फाउंडेशनतर्फे

# विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप

निफाड ।रामभाऊ आवारे
(दै. महाभारत)

**सामाजिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या युनिटी फाउंडेशन तर्फे गरजू विद्यार्थ्यांसाठी वह्या वाटप प्रकल्प राबविण्यात आला. या उपक्रमाअंतर्गत शाळांमधील गरजू विद्यार्थ्यांना मोफत वह्या वितरित करण्यात आल्या. क्रिएटिव माइंड स्कूल गांधीनगर येथे शालेय विद्यार्थ्यांना वही वाटप करण्यात आले**




त्या प्रसंगी शाळेच्या मुख्याध्यापक श्रीमती मनिषा मनोज जोंधळे मॅडम तसेच पूजा वानखेडे,आशा दिवे,प्रांजल पगारे,प्रिया नितनवरे राजेश गिरी ,स्वाती जाधव,नेहा पाटील हे शालेय शिक्षक उपस्थित होते.अँड.विनया नागरे ,आरती जैन आणि धनश्री गायधनी याची विशेष उपस्थिती होती. या उपक्रमाचे आयोजन युनिटी फाउंडेशनच्या अध्यक्षा अ‍ॅड.एकता कदम यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले. या प्रसंगी त्यांनी सांगितले की, शिक्षण ही मुलांची मूलभूत गरज असून गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य पुरवणे हे आपल्या सामाजिक जबाबदारीचा भाग आहे. या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची गोडी निर्माण व्हावी, हा उद्देश आहे.कार्यक्रमात अनेक स्वयंसेवकांनी सहभाग घेतला. पालक आणि शाळेतील शिक्षकांनी युनिटी फाउंडेशनच्या या स्तुत्य उपक्रमाचे मन:पूर्वक कौतुक केले.



## कातरणी विद्यालयात आषाढी एकादशी निमित्ताने दिंडी सोहळा संपन्न

निफाड ।रामभाऊ आवारे
(दै. महाभारत)

संत ज्ञानेश्वर माध्यमिक विद्यालय कातरणी तालुका येवला या गावी संपूर्ण गावातून आषाढी एकादशी निमित्ताने भव्य दिंडी काढण्यात आली यावेळी तेथे उपस्थित असलेले विद्यालयातील मुख्याध्यापक श्री एच. एन भामरे सर तसेच गायकवाड सर, आवारे सर, ठाकरे सर, कदम सर, बारे सर, जगताप सर ,येवले सर, एल.एन वैराल मॅडम, एस.बी पाटिल मॅडम, वाय. ए पाटील मॅडम ,पाटील भाऊसाहेब, शिंदे मामा, बागल मामा, वाकचौरे मामा, आणि सर्व विद्यार्थी, विद्यार्थिनी, सरपंच, उपसरपंच,भजनी मंडळ कातरणी, विविध स्तरावरील पदाधिकारी ग्रामस्थ उपस्थित होते. ज्ञानोबा तुकाराम यांच्या जयघोषात, पंचपदी, वेगवेगळे अभंग, गवळण सादर करत दिंडी काढण्यात आली. भजनी मंडळाने खूप उत्कृष्ट असे भजन सादर केले विद्यार्थीनी हिरीरीने सहभागी होऊन काही विद्यार्थी वारकरी वेषभूषेत तर काही संत यांच्या तर काही विद्यार्थी विठ्ठल व रखुमाई यांच्या वेषभूषेत तयार झाले होते डोक्यावर मुलींनी ग्रंथ आणि कलश तुळस घेत उस्फूर्त पणे सहभाग घेतला मुलींनी पखवाजाच्या तालावर नाचत, फुगडी घालत दिंडी मध्ये रंगत आणली सर्व ग्रामस्थांनी विद्यार्थ्यांचे खूप कौतुक केले ग्रामस्थांचे, भजनी मंडळाचे आभार मानले अशा प्रकारे दिंडी सोहळा पार पडला.

# खरीप हंगामासाठी बियाणे व खते उपलब्ध करून द्यावे : ना. भुजबळ

नाशिक / शांतारामभाऊ दुनबळे
(दै महाभारत)

नाशिक :-नाशिक जिल्ह्यात सर्वत्र पाऊस झाल्यामुळे या खरीप हंगामात शेतकऱ्यांना मुबलक प्रमाणात बियाणे व खते उपलब्ध करून द्यावेत, अशा सूचना मंत्री छगन भुजबळ यांनी दिल्या.येवला येथील संपर्क कार्यालयात आयोजित विविध विभागांच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी येवला उपविभागीय अधिकारी बाबासाहेब गाढवे, निफाड उपविभागीय अधिकारी शशिकांत मंगरुळे, येवला तहसीलदार आबा महाजन, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता दिलीप देवरे, गटविकास अधिकारी नम्रता जगताप, गटविकास अधिकारी संदीप वायाळ, तालुका कृषी अधिकारी शुभम् बेरड, नगरपालिकेचे मुख्याधिकारी तुषार आहेर, उपअभियंता पी. आर. घोडे, उपअभियंता आर. यू. पुरी, पोलीस उपअधीक्षक बाजीराव महाजन, शाखा



अभियंता गणेश चौधरी यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

ना. छगन भुजबळ यांनी आवाहन केले, की खरीप हंगामात विक्रेत्यांकडून शेतकऱ्यांना बियाणे रास्त दराने विक्री होईल, तसेच खताचा बफर स्टॉक करून ठेवावा आणि खताची लिंकिंग होणार नाही याबाबत काटेकोर दक्षता घेण्यात यावीत येवला तालुक्यात पाऊस सुरू झाला असून पाणीटंचाईच्या दृष्टीने आवश्यक त्या ठिकाणी पाण्याचे टँकर सुरू ठेवावेत. येवला तालुक्यात ५० कोटी उद्दिष्टापैकी ३९ कोटी पीक कर्ज वाटप झाले आहे ही बाब समाधानकारक असून, मागणीनुसार शेतकऱ्यांना पीक कर्ज द्यावे. प्रादेशिक पाणीपुरवठा योजनांचा आढावा घेताना ना. भुजबळ म्हणाले, की राजापूर व ४० गावे प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेतील पंपिंग जॅकवेल व पाईप जोडणीसंदर्भातील कामे तातडीने पूर्ण करावी. धुळगाव व १६ गावे प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेतील पाण्यांच्या टाक्यांचे बांधकाम संबंधित कामांना गती द्यावी. येवला ३८ गावे प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेतील रिट्रोफिटिंगकरिता आवश्यक

असलेल्या मोटर्स साठी निविदा प्रक्रिया सुरू करावी. विंचूर लासलगावसह १६ गावे प्रादेशिक पाणीपुरवठा योजना महिनाभरात पूर्ण करण्याचे निर्देश ना. भुजबळ यांनी दिले.येवला शहरातील झोपडपट्टीवासीयांना घरकुल, आवास योजनेअंतर्गत घरे उपलब्ध करून देण्यासाठी जागा उपलब्ध करण्यासाठी आवश्यक प्रस्ताव तातडीने सादर करावेत. पंचायत समिती स्तरावरील आवश्यक जागेसाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रस्ताव सादर करावेत. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर येवला-लासलगाव येथील शेतकरी व नागरिकांच्या विजेसंदर्भातील सर्व तक्रारीचे निवारण करून विद्युतपुरवठा सुरळीत राहील, याची दक्षता घेण्याचे आदेश ना. भुजबळ यांनी दिले.

## पावसाने दांडी मारल्याने

# शेतकरी झाले हवालदिल

चकलंबा / शेख सलमान
(दै.महाभारत)

चकलाबा परिसरात जुन महिन्याच्या सुरवातीला झालेल्या जेमतेम पावसाने पुन्हा ओढ दिल्याने पेरणी केलेली पिके मातीतून कोंब बाहेर पडत नसल्याने बियाणे कुजले आहे, तर काही कोवळी पिके उन्हात कोमेजून जाऊ लागल्याने शेतकरी हवालदिल झाले असून दुभार पेरणीचे संकट उभे राहिल्याने शेतकऱ्यांना आर्थिक नुकसानीचा सामना करावा लागण्याची शक्यता आहे.चकलबा परिसरात जुन महिन्याच्या सुरवातीला झालेल्या जेमतेम पावसाने पुन्हा ओढ दिल्याने पेरणी केलेली पिके मातीतून कोंब बाहेर पडत नसल्याने बियाणे कुजले आहे, तर काही कोवळी पिके उन्हात कोमेजून जाऊ लागल्याने शेतकरी हवालदिल झाले असून दुभार पेरणीचे संकट उभे राहिल्याने शेतकऱ्यांना आर्थिक नुकसानीचा सामना करावा लागण्याची शक्यता आहे.यंदा गेवराई तालुक्यातील काही भागात जून महिन्यात काही पडला नाही. जून महिन्यात सगळी नक्षत्र कोरडी ठाक गेली. जुलै महिन्यात तुरळक पाऊस पडला जमिनीत पाणी काही प्रमाणात जिरल्याने ओलावा तयार झाला. त्या ओलाव्यावर शेतकऱ्यांनी कापूस,तूर, मूग,यांची लागवड केली.मोठ्या प्रमाणावर खर्च करून पिके शेतात उभी केली, मात्र पिके उभी राहत नाही तोच पावसाने ओढ दिली. अनेक दिवसांपासून पावसाच्या पाण्याचा थेंब देखील पडला नाही. विहिरी उन्हाळ्यात कोरड्याठाक पडल्या आहे. त्यामुळे शेतात पिकांना पाणी पुरवठा कसा करावा असा प्रश्न निर्माण झाला आहे.

त्यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत आले आहे. यंदाची पिके शेतात उभी करण्यासाठी उसनवारी करीत बियाणे, खते खरेदी केली आहे. मोठया प्रमाणावर आलेला खर्च पावसाच्या लहरीपणामुळे वाया जाऊ लागल्याने शेतकरी हवालदिल झाले आहे.शेतात लागवड केलेल्या पिकांचा पंचनामा करावा, जमिनीतुन न उगवणाजया बियाणांचा खर्च सरकारने देऊन शेतकजयांना दिलासा द्यावा, अशी मागणी शेतकरी करत आहे.

दुकानदारांची उसनवारी करून बियाणे खरेदी केली आहे. पावसाचा जोर कायम राहील म्हणून काळ्या मातीत बियाणे फेकून मोठी जुगार शेतकरी खेळला आहे. पावसाने ओढ दिल्याने पिके उगवत नाही. उगवलेले पिके करपून गेल्याने दुभार पेरणीचे संकट उभे राहिले आहे. त्यामुळे शेतकर्यांना दिलासा मिळाला यासाठी पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी.- शरद खेडकर चकलांबा शेतकरी.

आदर्श प्राथमिक व ग्रामगीता माध्यमिक विद्यालयामध्ये आषाढी एकादशी निमित्त

# शाळेतील चिमुकल्यांनी विठ्ठल नामाचा जयघोष करीत त्यात उत्स्फूर्त नोंदवला सहभाग

फुलंब्री / सुधाकर जेठे
(दैनिक महाभारत)

तालुक्यातील पिंपळगाव वळण मतेवाडी फाटा येथील आदर्श प्राथमिक,माध्यमिक व उच्च माध्यमिक तसेच ग्रामगीता माध्यमिक विद्यालयाच्या वतीने व जिल्हा परिषद वस्ती शाळेचा वतीने आडगाव येथे शाळेयमधील चिमुकल्यांनाही आषाढी एकादशीचे महत्त्व काय असते यावेळी दिंडीत सहभागी होऊन आषाढी एकादशी साजरी करण्यात आली. वृक्षदिंडी, रिंगण असे अनेक उपक्रम यावेळी राबविण्यात आले. चिमुकल्यांनी विठुनामाचा जयघोष करीत त्यात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.यावेळी छतपती शिवाजी महाराज यांचा प्रतिमेचे पूजन करून दिंडीची सुरवात करण्यात आली. यावेळी आडगाव जणू पंढरपूर सारखा दुमदुमला होता.गावकरी यांनी या दिंडीत सहभागी होऊन गवळण, भजन आदी गीत साजरे केले.विद्यार्थ्यांचे यावेळी



गावकऱ्यांचा वतीने स्वागत करण्यात आले. विद्यार्थी व विद्यार्थिनीनी विठ्ठल व रुख्माई ची वेशभूषा धारण करून गावकऱ्यांची मने जिंकली.तसेच विद्यार्थी व विद्यार्थिनींनी शेतात करणारा कष्टकरी शेतकरी तसेच आई वडिलांची सेवाकरी यांच्यावर सादर केलेली नाटिकाने सर्व गावकऱ्यांचे लक्ष वेधून घेतले होते.याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष व शेतकरी संघटना जिल्हाध्यक्ष श्री काशिनाथ जाधव, संस्थेच्या संचालिका लताबाई जाधव,शाळेचे संचालक ,संस्थेचे सचिव व कृषी उत्पन्न बाजार समिती फुलंब्री संचालक श्री योगेश जाधव, मुख्याध्यापिका अश्विनी जाधव तसेच ह भ प विजय महाराज भुमे,देवराव भुमे,औचितराव भुमे, काकासाहेब भुमे,आबासाहेब धोंडकर,धोंडीबा गवरे,गंगा भुमे,दिगंबर भुमे,हरिभाऊ धोंडकर,राजू भुमे दामोदर भुमे सुधाकर भुमे ईश्वर भुमे दिनेश भुमे विनोद भुमे शरद शिंदे अंबादास भुमे प्रवीण भुमे नंदू भुमे योगेश चव्हाण दिपक काळे लक्ष्मण भुमे व आडगाव ते भाविक भक्त व गावकरी मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहशिक्षक सचिन निर्मळ,अनिल गायकवाड, अन्सार शेख,अनिल थोरात, वैशाली तायडे, पुष्पा काकडे, सविता लाडगे, कल्पना मिसाळ,परसराम घुगे, संदीप निधोनकर, निता गायकवाड,जिवन पवार, भाऊसाहेब शिरसाठ,आकाश मस्के, आदीसह शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.



## वृक्षारोपण करून वाढदिवस साजरा ;व्हॉलीबॉल प्रेमी ग्रुपचा स्तुत्य उपक्रम

केज ।सुमित मोरे
(दै, महाभारत )

पर्यावरण संरक्षण काळाची गरज आहे.बदलत्या वातावरणाचा पर्यावरणावर होत असलेला विपरीत परिणाम लक्षात घेता एक वृक्ष लावुन जन्मदिवस साजरा करुया पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी प्रयत्न करुया. ही संकल्पना घेऊन व्हॉलीबॉल प्रेमी ग्रुप, धनेगावच्या वतीने व्हॉलीबॉल प्रेमी सत्तार शेख यांच्या वाढदिवसानिमित्त धनेगाव कॅम्प येथील व्हॉलीबॉल मैदान परिसरात वृक्षारोपण करून वाढदिवस साजरा करण्यात आला.

सद्य परिस्थितीत मोबाईल मध्ये गुंतलेली तरुण पिढी आणि त्यामुळे मैदानी खेळ मोबाईलच्या युगात लोप पावत असताना मात्र धनेगाव कॅम्प व परिसरातील तरुणांनी एकत्र येत व्हॉलीबॉल प्रेमी ग्रुप ची स्थापना केली आहे.दैनंदिन हे तरुण मैदानावर एकत्र येत व्हॉलीबॉल खेळाचा आनंद घेत असतात.त्यातील व्हॉलीबॉल प्रेमी सत्तार शेख यांच्या वाढदिवसानिमित्त ग्रुपच्या वतीने वृक्षारोपण करून आगळा वेगळा वाढदिवस साजरा केला आहे.

यावेळी रवींद्र नवले,धनंजय गुजर,सिद्धार्थ पोटभरे,सत्तार शेख,सुनील गुजर,अमोल गोरे,सुजय पकवे, सुहास गुजर,गणेश शिंपले,नबी सय्यद,अजय वाघमारे,बालाजी सिरसाट,कैलास गुजर सिद्धेश्वर गुजर,ओम आंबुरे यांच्यासह व्हॉलीबॉल प्रेमी ग्रुपचे सदस्य उपस्थित होते.

# संभाजी ब्रिगेड पक्ष विभागीय कार्याध्यक्ष पदी गणेश अंदुले यांची नियुक्ती

वाशिम / हफीज खान
(दै.महाभारत)

अकोला:- संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष मनोजदादा आखरे यांच्या आदेशानुसार स्थानिक मराठा सेवा संघ कार्यालयातील सभगृहा मध्ये संभाजी ब्रिगेड कार्यकारिणी पुनर्गठन बैठक आयोजित करण्यात आली होती. या कार्यक्रमामध्ये गेली पंचवीस वर्षांपासून संभजी ब्रिगेड या संघटनेत सक्रिय असणारे तसेच ग्राम शाखे पासुन जिल्हा पातळीवरील अनेक पदाची दिलेली जबाबदारी यशस्वी पणे सांभाळणारे बार्शिटाकळी तालुक्यातील ग्राम टेंभी येथिल गणेश अंदुले यांच्या कार्याची दखल घेऊन संभाजी ब्रिगेड अमरावती विभागीय अध्यक्ष गजानन भोयर यांनी नियुक्ती पत्र देऊन विभागीय कार्याध्यक्ष पदाची जबाबदारी दिली. माझ्यावर आपण दाखविलेला विश्वास मी सार्थ करेन व दिलेल्या जबाबदारी ला पूर्ण पने न्याय देईल तसेच या पदाचा उपयोग मी सर्वसामान्यांना न्याय मिळवून देण्यासाठी, त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी करेन.असा विश्वास गणेश अंदुले यांनी




त्यांच्या मनोगत व्यक्त करतांना उपस्थितांना दिला. सर्व सामान्य कुटुंबातून नेतृत्व निर्माण करण्याचं काम संभाजी ब्रिगेड हा पक्ष करतो म्हणुन ज्यांना राजकिय इच्छा शक्ती आहे राजकिय नेतृत्व म्हणुन पुढे यायचे आहे त्यांनी संभाजी ब्रिगेड या पक्षामध्ये प्रवेश करावा कारण लोकांचाही प्रस्थापित पक्ष आणि प्रस्थापित नेत्यांवरील विश्वास उडाला आहे.या कार्यक्रमाला संभाजी ब्रिगेड प्रदेश प्रवक्ते प्रेमकुमार बोके, प्रदेश संघटक योगेश पाटील, मराठा सेवा संघ केंद्रीय कोषाध्यक्ष अशोक पटोकार, डॉ. पुरुषोत्तमजी तायडे, मराठा सेवा संघ जिल्हा अध्यक्ष प्रशांत जानोरकार, संभाजी ब्रिगेड जिल्हा अध्यक्ष अँड . नमन पाटिल आंबेकर.युवक आघाडी जिल्हाध्यक्ष आकाश कऱ्हाडे, कामगार आघाडी जिल्हा अध्यक्ष बाबुलालजी डोंगरे , डॉ.प्रकाश गोंड मा.जिल्हाध्यक्ष संभाजी ब्रिगेड, सुरज महल्ले, स्वप्नील धांडे, दत्तात्रय कौसल,संदीप उपरवट, दिलीप देशमुख, विनोद साबळे, गोपाल घुंगट, इत्यादी शेकडो कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.

जिल्हा शिक्षणाधिकारी मा. सुनील भोपळे व गटशिक्षणाधिकारी

# मा. सुरेखा तांबट यांच्या हस्ते पत्रकार विश्वास गायकवाड यांचा सन्मान

बोरघर / माणगाव
( विश्वास गायकवाड)

शासनाच्या शंभर कलमी कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्र राज्य शालेय शिक्षण विभागाच्या माध्यमातून 'घर घर संविधान' साक्षरता जनजागृती कार्यक्रमाचा जागर राज्यातील प्रत्येक जिल्हा निहाय जिल्हा परिषद शिक्षण विभागाच्या अखत्यारीत सर्व तालुका पंचायत समिती शिक्षण विभागाच्या माध्यमातून करण्यात आला. शासनाच्या या संविधान गौरव राष्ट्रीय उपक्रमाची अत्यंत प्रभावीपणे अंमलबजावणी माणगांव तालुका पंचायत समिती शिक्षण विभागाच्या प्रमुख तथा गटशिक्षणाधिकारी मा. सुरेखा तांबट मॅडम यांच्या कार्य कुशल नेतृत्वाखाली, मार्गदर्शनाखाली, सर्व केंद्र प्रमुख, विस्तार अधिकारी, तंत्र स्नेही, साधन व्यक्ती, शिक्षक, शिक्षिका आणि विद्यार्थी यांच्या माध्यमातून तालुक्यातील सर्व शाळांमधून करण्यात आली.

शासनाच्या सदर राष्ट्रीय विधायक कार्यात सहभाग घेवून हे अभियान यशस्वी करणार्या प्रशासकीय अधिकारी,



केंद्र प्रमुख, तंत्र स्नेही, शिक्षक, शिक्षिका, विद्यार्थी आणि सदर उपक्रमाची दखल घेऊन हा उपक्रम संपूर्ण महाराष्ट्र राज्यासह देशाच्या कानाकोपऱ्यात आपल्या लेखणीच्या माध्यमातून पोहचवणार्या पत्रकारांचा सत्कार कार्यक्रमात गोरेगांव येथील ना. म. जोशी महाविद्यालयात आयोजित भव्यदिव्य कार्यक्रमात माणगांव तालुक्यातील बोरघर गावचे सुपुत्र निर्भीड पत्रकार विश्वास गायकवाड यांचा सत्कार रायगड जिल्हा शिक्षणाधिकारी मा. भोपळे साहेब आणि माणगांव तालुका गटशिक्षणाधिकारी मा. सुरेखा तांबट मॅडम यांच्या हस्ते सन्मानपूर्वक यथोचित सत्कार करून सन्मान करण्यात आला.

सदर कार्यक्रमाला जिल्हा शिक्षणाधिकारी मा सुनील भोपळे साहेब, माणगांव च्या कार्य कुशल गटशिक्षणाधिकारी मा सुरेखा तांबट मॅडम, चारिझेन फाऊंडेशन पदाधिकारी, सर्व केंद्र प्रमुख, तंत्र स्नेही, मुख्याध्यापक, मुख्याध्यापिका, विद्यार्थी दैनिक रायगड स्वाभिमानचे संपादक मा. रघुनाथ कडू साहेब उपस्थित होते.

शासनाच्या 'घर घर संविधान' या प्रेरणादायी राष्ट्रीय उपक्रमाची यशस्वी यशोगाथा अहवाल पुस्तिका आणि चलचित्रपट माणगांव पंचायत समिती शिक्षण विभागाच्या माध्यमातून प्रकाशित करण्यात आला या मध्ये माणगांव तालुका शिक्षण विभागाने आवर्जून पत्रकार विश्वास गायकवाड यांच्या शासनाच्या सदर उपक्रमाला सर्वदूर प्रसारित करणार्या राष्ट्रव्यापी बातम्यांचा सन्मानपूर्वक समावेश करण्यात आला आहे. हा त्यांच्या निस्पृह आणि निर्मोही लेखणीचा आणि पत्रकारितेचा गौरव आहे.

# बौद्धजन पंचायत समिती शाखा क्रमांक पाच खरवली विभागाच्या वतीने



## एसटी महामंडळाचे सेवा निवृत्त वाहक रविंद्र कासारे यांना सेवा निवृत्तीच्या शुभेच्छा

बोरघर / माणगांव
( विश्वास गायकवाड)

बौद्धजन पंचायत समिती शाखा क्रमांक पाच खरवली विभाग शाखेच्या कार्यक्षेत्रातील नालंदा बौद्धजन सेवा संघ पेण चे सभासद रविंद्र गंगाराम कासारे हे महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या तथा एसटी महामंडळाच्या त्री दशक पुर्ती प्रदीर्घ सेवेनंतर नियत वयोमानानुसार सेवा निवृत्त झाले.

रविंद्र गंगाराम कासारे यांनी तब्बल तीन दशके राज्य परिवहन महामंडळाच्या तथा एसटी महामंडळात वाहक या पदाची जबाबदारी अतिशय चांगल्या प्रकारे, कर्तव्य दक्ष, कर्तव्य तत्परतेने आणि अत्यंत जोखमी ने पारदर्शकपणे सांभाळून सेवा निवृत्ती पर्यंत आपल्या सेवेला गालबोट न लागता परिपूर्ण केली. आपल्या सेवा काळात कर्तव्यावर असताना ते आपल्या एसटी बस मधील प्रवाश्यांसी अत्यंत विनम्रपणे आणि हसतखेळत वागले. त्यांनी महाड, रोहा, माणगांव डेपोच्या कार्यक्षेत्रात कर्तव्य बजावत प्रवाश्यांची सेवा केली आहे.

सामाजिक उत्तरदायित्त्व म्हणून बौद्धजन पंचायत समिती तालुका शाखा माणगांव अंतर्गत विभागीय शाखा अर्थात बौद्धजन पंचायत समिती शाखा क्रमांक पाच खरवली विभाग या विभाग शाखेच्या वतीने सदर शाखेचे पदाधिकारी, विद्यमान शाखेचे अध्यक्ष मा. विवेक जाधव, उपाध्यक्ष मा. राजेश कासारे, सचिव मा. अमोल मोहिते, दुय्यम सचिव मा. नंदू कांबळे, ऑडिटर मा. संतोष मोरे, शाखेचे माजी सचिव तथा सेवा निवृत्त केंद्र प्रमुख मा. लक्ष्मण जाधव, संघटक मा. पराग जाधव, नालंदा बौद्ध सेवा संघ पेण चे सभासद तथा सेवा निवृत्त बैंक कर्मचारी मा. सुरेश कासारे, शाखेचे माजी सहसचिव तथा पत्रकार विश्वास गायकवाड यांच्या हस्ते शाखेच्या जनरल मिटिंग मध्ये सेवा निवृत्त रविंद्र गंगाराम कासारे यांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत करून सेवा निवृत्तीच्या भरभरून शुभेच्छा दिल्या.

शिर्डीतील गणेशवाडी मुख्य रस्ता १२ मीटर करावा

# मनसेचे कोते यांच्या नेतृत्वात मुख्याधिकाऱ्यांना निवेदन

शिर्डी / संजय महाजन
(दै.महाभारत)

शिर्डी येथील गणेशवाडी परिसरातील मुख्य रस्ता हा १२ मीटर करावा यासाठी मनसेचे दत्तात्रय कोते यांच्या नेतृत्वात मुख्याधिकारी सतिष दिघे यांना महिलांच्या उपस्थितीत निवेदन देण्यात आले.यावेळी दत्तात्रय कोते म्हणाले, माझ्या प्रभागातील पानमळा ते रामनगरी नांदुर्खी शिवेपर्यंत सर्व रस्त्याचे काम करण्यात आले, परंतु सर्वात मोठा रहिवासी भाग असलेला एकूण १४ गल्ल्या असणारा गणेशवाडी मुख्य रस्ता हा डि.पी. प्लॅननुसार १२ मीटर आहे. तो रोड भूसंपादन करून करावा, अशी मागणी वारंवार प्रत्येक नगरपंचायत मिटिंगमध्ये केली आहे. शिर्डी शहरातील सर्व विकासकामे पालक मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या नेतृत्वात चालू आहेत; मग आमच्या भागातील साधारणतः दीड दोन किलोमीटर रोड आपण निधी उपलब्ध




करून करू शकता. आज रोजी फक्त १० ते १२ फुटांचा रोड आहे. महिलांना पायी चालताना समोरून एखादी ४ चाकी गाडी आली तर रोडच्या खाली उतरावे लागते. खूप मोठी दळणवळण या रोडवर आहे. त्या भागातील लोकांचे घरांचे काम चालू आहे. मोठे डंपर येतात, महिलांना खूप त्रास सहन करावा लागत आहे. सदर रस्त्याचे काम तात्काळ सुरू न झाल्यास या परिसरातील नागरिक आंदोलन करणार आहेत.

मुख्याधिकारी सतिष दिघे म्हणाले, या रोडलगत कोते, गोंदकर आणि अन्य लोकांची शेती आहे. त्यांनी सहमती दिली तर मी १५ दिवसात रस्ता तयार करुन देतो; परंतु शेतकरी त्यांच्या जमिनीचा मोबदला मागतात. आपण आता भूसंपादनाची प्रक्रिया करून वेळ जाईल. सद्यस्थितीत जो रोड आहे तो २० फुटांपर्यंत आपण करू, असे मुख्याधिकाऱ्यांनी यावेळी सांगितले.

# इंदिरा काँग्रेसच्या तालुका अध्यक्षपदी सिद्धेश्वर रणदिवे यांची निवड

किल्लेधारूर / आशोक सुरवसे
(दै.महाभारत)

धारूर येथील सामाजिक कार्यात नेहमीच अग्रस्थानी असलेल्या सिद्धेश्वर रणदिवे यांची इंदिरा काँग्रेसच्या धारूर तालुका अध्यक्षपदी निवड झाली आहे त्यांना तसे नियुक्तीचे पत्र देण्यात आहे.गेल्या अनेक वर्षापासून त्यांनी इंदिरा काँग्रेस पक्षात चांगले कार्य केले आहे काही वर्षांपूर्वी त्यांची तालुकाध्यक्षपदी निवड झाली होती. हीच निवड पुन्हा एकदा करण्यात आली असून तालुका अध्यक्ष पदाची जबाबदारी त्यांच्यावर देण्यात आली आहे. महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या आदेशाने जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांच्या स्वाक्षरीने त्यांना निवडीचे पत्र देण्यात आले आहे. ते माजी राज्यमंत्री अशोकराव पाटील व रजनीताई पाटील यांचे विश्वासू समजले जातात. त्यांच्या या तालुकाध्यक्षपदी निवड झाल्या बद्दल प्राचार्य विजयकुमार शिनगारे, आदर्श शिक्षक नाथा ढगे, पत्रकार संघाचे अध्यक्ष अतुल शिनगारे, काँग्रेसचे अनेक ज्येष्ठ कार्यकर्ते यांच्यासह अनेक सामाजिक



कार्यकर्त्यांनी अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# आषाढी एकादशीनिमित्ताने कांबा–पाचवामैल येथील श्री सिध्देश्वर मंदिरात भक्तांची मांदियाळी!



कल्याण / संजय कांबळे
(दै.महाभारत)

पाऊले चालती पंढरींची वाट,असे म्हणत लाखो भाविक पंढरीच्या दिशेने वाटचाल करतात, पण प्रत्येकाला पांडुरंगाला भेटण्यासाठी पंढरपूरला जाणे शक्य होत नाही, त्यामुळे ते कल्याण तालुक्यातील कांबा-पाचवामैल येथील श्री क्षेत्र सिध्देश्वर मंदिरात सावळ्या विठोबा रखुमाई ला भेटण्यासाठी, दर्शनासाठी येत असतात.उल्हास नदीच्या काठावर कांबा-पाचवामैल येथे श्री क्षेत्र सिध्देश्वर मंदिर आहे. कल्याण ग्रामीण परिसरात हे प्रति पंढरपूर म्हणून ओळखले जातेत्यामुळे आषाढी एकादशीला ज्यांना पंढरपूरला जाता येत नाही ते सर्व कल्याण ग्रामीण भागाचे प्रतिपंढरपूर म्हणून ओळख निर्माण झालेल्या पाचवा मैल येथे दर्शनासाठी येतात,आज आषाढी एकादशी असल्याकारणाने सकाळपासूनच दर्शनासाठी रांग लागलेली होती,यामध्ये प्रसिध्द उद्योजक मोहन शेठ(बाबा)कांबा,अनिल शेठ शेलार, राकेशशेठ मोरे, ग्रामपंचायतीचे सदस्य संदिप पावशे,उद्योजक व माझी सदस्य मधुकर सिरोशे,पत्रकार संजय कांबळे यांच्यासकांबा,वरप,म्हारळ,पावशे पाडा,पाचवा मैल,उल्हासनगर,वाघेरापाडा,रायते,आदी परिसरातील भक्त दर्शनासाठी येत होते,यावेळी मधुकर सिरोसे यांच्यातर्फे आषाढी उपवास नाष्टा ची सोय करण्यात आली होती.मंदिर परिसरात पोलिस बंदोबस्त होता.

# द्वारकादास शामकुमारतर्फे १८०० वारकऱ्यांची विनामूल्य पंढरपूर वारी

खुलताबाद ।बाबासाहेब दांडगे
(दै. महाभारत)

आषाढी एकादशीनिमित्त गेली १५ वर्षांपासुन द्वारकादास शामकुमार ग्रुपच्या वतीने वारकऱ्यांना मोफत बस सेवा व अल्पउपहार सेवा केली जाते. याही वर्षी दि. ५ जुलै रोजी सकाळी छत्रपती संभाजीनगर, लातूर उदगीर, अंबाजोगाई, अहमदपूर येथून ३७ एस. टी. बसेसच्या माच्यातून १५०० ते १८०० वारकऱ्यांना पंढरपुर वारीसाठी विनामुल्य मार्गस्थ करण्यात आले.

यावेळी द्वारकादास शामकुमारचे संचालक सदाशिव पाटील याच्या मार्गदर्शनाखाली वारकऱ्यांचा यथोचित सत्कार करून प्रवासासाठी ब्लॅकेट, अल्पोपहार व पाणी बॉटल सोबत देण्यात आले. तसेच कोविड १९ च्या काळात एका मुलाचे छत्र हरपल्या नंतर त्याचा दोन वर्षे सांभाळ तसेच सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे उध्दव भोळे, एसटी



महामंडळात २५ वर्ष सुरक्षित सेवा देणारे चालक कार्तिक काळवणे, अहिल्यानगर जवळ झालेल्या अपघातात स्वतःची जीवाची परवा न करता ४५ प्रवासी वाचवणारे , गुणवंत कामगार नवनाथ बोडखे यांचा सत्कार करण्यात आला या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा.महापौर नंदकुमार घोडले होते. प्रमुख पाहुणे म्हणून जय बाबाजी भक्त परिवाराचे राजेंद्र पवार,मा.नगरसेवक, शिवाजी दांडगे विरभद्र गादगे, कविता ताई वाघ,ह.भ.प मनिषा ताई बीडाईत , एसटीच्या आगार व्यवस्थापक निलिमा ईसे, मंजुषा माने, सातारा पोलीस स्टेशन चे -.झ.ख. शैलेंद्र देशमुख, हरीभाऊ हिवाळे, अमोल हिवाळे, दिनेश गायके,डॉ अनुप सोनी, डॉ अजिंक्य देशमुख, डॉ पंकज पारीक, संतोष पार्डल शाम पाटील विजुभाऊ कल्याणकर, प्रकाश काकडे, नवनाथ पाटोदकर,आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मनोगत व्यक्त करताना द्वारकादास श्याम कुमारच्या वतीनं घेण्यात आलेल्या अनेक उपक्रमावदल माहिती देऊन वारकऱ्यांना प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या. द्वारकादास श्याम कुमार यांच्या कडून आषाढी एकादशीच्या वारीला जाण्यासाठी मोफत महाराष्ट्रातून बस उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. छत्रपती संभाजीनगर ते पंढरपूर आषाढी एकादशीच्या वारीला जाण्यासाठी वारकऱ्यांना बस मोफत उपलब्ध करून देण्यात आल्या.

## ९ जुलै २०२५ रोजी अकरा प्रधान कामगार संघटनेचा देशव्यापी संपाचा एल्गार

# बळीराम उबाळे, अशोक चव्हाण

गेवराई / प्रतिनिधी (दै.महाभारत)

महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद कर्मचारी महासंघाचे राज्य अध्यक्ष तथा राष्ट्रीय उपाध्यक्ष माननीय उमेशचंद्र चुलबुले साहेब व महाराष्ट्राचे निमंत्रक माननीय विश्वास काटकर साहेब सचिव संजय महाळणकर साहेब व राज्यातील सर्व पदाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली खालील मागण्यासाठी देशव्यापी व राज्यव्यापी संप होणार आहे १. केंद्र सरकारच्या ४ श्रम संहिता अनुसूचित व घातक असल्याने हाणून पाडणे २. राज्य शासनाच्या जन सुरक्षा विधेयक २०२४ रद्द करणे ३. समाज माध्यमावर व्यक्त होण्याच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर प्रतिबंध न करणे ४. झॠऊ- कायदा रद्द करणे व २००५ नंतर नोकरीच लागलेल्या सर्व कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन लागू करणे ५. कंत्राटी कामगार कर्मचारी यांना सेवेत नियमित कायम करावे ६. आठवा वेतन आयोग घोषित केला परंतु समिती गठित केली नाही ती सत्वर करावी ७. किमान वेतन २६००० /- लागू करावे ८. पद भरती वरील निर्बंध हटवून रिक्त पदे भरण्यात यावी व इतर महत्त्वाच्या मागण्या ९. दोन





टक्के महागाई भत्ता जानेवारी २०२५ पासून देण्यात यावा तसेच राज्याच्या राष्ट्रीय सुधारित निवृत्ती योजना संदर्भात अद्यापही आधी सूचना पारित करण्यात शासनाने पुढाकार घेतलेला नाही त्यामुळे मधल्या कालावधीत निवृत्त झालेले कर्मचारी चिंता तूर झालेले आहेत १०. अनुकंपा धारकांना तात्काळ नोकरीत सामावून घेण्यात यावे मागण्यासाठी राज्य सरकारी जिल्हा परिषद निम सरकारी शिक्षक शिक्षक उत्तर कर्मचारी व बीड जिल्ह्यातील सर्व प्रवर्ग संघटना कर्मचाऱ्यांनी नऊ जुलै च्या संपात सहभागी व्हावे असे आव्हान बीड जिल्हा कर्मचारी महासंघाचे जिल्हाध्यक्ष बळीराम उबाळे सरचिटणीस नंदकिशोर परळकर उपाध्यक्ष अशोक चव्हाण कार्याध्यक्ष डॉक्टर संभाजी जाधव कोषाध्यक्ष उमेश हलजुते कार्याध्यक्ष शिवलाल राठोड शिक्षक संघटनेचे गजानन भोसले सर महिला अध्यक्ष रेखा कवडे सहसचिव प्रदीप बनकर सल्लागार भागवत वाघ मकरध्वज सावंत संघटक विलास बहिरवाळ चतुर्थ श्रेणीचे अर्जुन शेळके वाहन चालक अध्यक्ष अनिल गोरे आरोग्याचे अध्यक्ष आशाताई धुतमल आरोग्य अध्यक्ष भारत नागरगोजे स्थापत्य अभियांत्रिकी राज्यउपाध्यक्ष ओमकार उबाळे स्था अध्यक्ष सचिन तांदळे सचिव रुपेश कोकीळ जि प लेखा अध्यक्ष कृष्णा वैराग्य जि प कर्मचारी अध्यक्ष प्रदीप राठोड मार्गदर्शक भीमराव काटे इत्यादीने महासंघाच्या प्रसिद्ध पत्रकार द्वारे कळविले आहे.

# गंगापूर मधील रायपूर येथील विठूनामाच्या गजराने दुमदुमल्या जिल्हा परिषद शाळा

गंगापूर / निलेश पवार
(दै.महाभारत)

चिमुकले मोट्या सख्याने हरी विठ्ठल नामाचा गजर,करत काढली, बालके शिक्षक, शिक्षिका कां सह गावकरी विठू नामाचा गजर केला.छत्रपती संभाजी नगर मधील गंगापूर तालुक्यातील रायपूर येथे आषाढी एकादशीच्या दिवशी अनेक शाळांना सुट्टी असल्याने आदल्या दिवशी म्हणजे शनिवारीच विठूनामाच्या गजराने शहरातील शाळा दुमदुमल्या आहेत. बालवारकऱ्यांनी हातात टाळ, मृदंग घेऊन विठूनामाचा जयघोष केला. तसेच वारी, रिंगण सोहळे, पालखीचे कार्यक्रम, अभंगांचे सादरीकरण विद्यार्थ्यांनी उत्साहात केले.

बालक माई, विठू, रुख्मिणी माऊली मंदिर शिक्षण मंडळ संचलित जिल्हा परिषद व बालक मंदिर मराठी विभागामध्ये शनिवार आषाढी-एकादशी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यार्थ्यांनी यावेळी पारंपारिक वेशभूषा साकारत विठूनामाचा गजर केला. यावेळी पालखी सोहळ्याचे, विठोबाच्या पालखी व दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. दीपप्रज्वलन व प्रतिमा पूजन करून सोहळ्याला प्रारंभ करण्यात आला. विद्यार्थ्यांनी केलेल्या विठोबा-रखुमाईच्या वेशभूषेने हा सोहळा अधिक रंगला. विद्यार्थ्यांनी स्वत: हाताने तयार केलेल्या पालख्यांचे प्रदर्शन यावेळी शाळेत भरविण्यात आले होते. माऊली माऊली विठ्ठल विठ्ठल अशा जयघोषाने शालेय परिसर दुमदुमला होता. तसेच यावेळी विविध संताची वेशभूषा विद्यार्थ्यांनी साकारली होती. कार्यक्रमातून सांगण्यात आले. शाळेच्या मुख्याधापक शामराव आहेर, शिक्षक रवींद्र देवरे, अजय डोणगावकर, आप्पसाहेब ठेगडे,



राजेंद्र आढाणा,शिक्षिका स्वाती उद्दिकर जयश्री पाटील, सोनाली टाकळ कर, विद्यार्थी, शिक्षक,आर, देवरे आ, डोणगावकर, आ, ठेगडे, आर, आटन, शिक्षिका,स्वाती, उद्देकर जयश्री पाटील सोनाली टाकळकर सरपंच मीना कीर्तिकर, उपसरपंच, योगेश गिरते, अध्यक्ष, सुप्रिया गोडके, विद्यार्थीनीं सिध्दी देशमुख,भक्ती देशमुख,शुभम साळुंके ,गायत्री साळूंके ,संत मिराबाई- श्रध्दा निकम तुकाराम - प्रतिक देशमूख ज्ञानेश्वर - शुभम साळुंखे जनाबाई संस्कृती घोडके साता माळी - स्वराज देशमुख कान्होपात्रा - सई घोडके नामदेव साईराज देशमूख मुक्ताबाई अनुजा आहेर बहिणाबाई अवनी देशमुख विठ्ठल - रुदांश घोडके रुखमाई - रितिका काळे शिक्षकेतर, कर्मचारी, गावकरी भक्त परिवार उपस्थित होते.

# आषाढी एकादशीनिमित्त धाकटी पंढरी श्री क्षेत्र भगवानगडावर उसळली भाविकांची मांदियाळी

भगवानगड / प्रतिनिधी
(दै.महाभारत)

लाखो भाविकांचे श्रद्धास्थान तथा धाकटी पंढरी श्री क्षेत्र भगवानगडावर देवशयनी आषाढी एकादशीनिमित्त भाविकांनी मोठी गर्दी केली होती. वारकरी संप्रदायामध्ये वर्षातील काही मोजक्या दिवसांना विशेष महत्व आहे. त्यापैकी आषाढी एकादशी म्हणजे साधूसंत आणि भगवान पांडुरंग परमात्मा यांच्या भेटीचा विशेष दिवस मानला जातो. या दिवशी पंढरपूरमध्ये देवाला भेटण्यासाठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून व संपूर्ण देशभरातून लाखो भाविक पंढरपूरला जातात. देवाच्या भेटीला जाताना वारकरी शेकडो पालख्यांच्या समूहाने पायी चालत



व भजन कीर्तन करत मोठया आवडीने भगवंताचे गुण गायन करत जातात. यामध्ये प्रामुख्याने श्री संत ज्ञानेश्वर महाराजांची पालखी, श्री संत निवृत्तीनाथ महाराजांची पालखी,संत मुक्ताबाईंची पालखी, श्री संत सोपानकाका महाराजांची पालखी, श्री संत श्री संत तुकाराम महाराजांची पालखी, श्री संत एकनाथ महाराजांची पालखी, श्री क्षेत्र भगवानगडावरून श्री संत भगवानबाबांची पालखी यांसह इतर अनेक संतांच्या पालख्या पंढरपूरला जातात. परंतु ज्या भाविकांना पंढरपूरला जाणे शक्य होत नाही असे लाखो भाविक दरवर्षी धाकटी पंढरी श्री क्षेत्र भगवानगडावरील विजयी पांडुरंग व वै.श्री संत भगवानबाबांच्या समाधी दर्शनासाठी गडावर येतात. यावर्षीही आषाढी एकादशीनिमित्त लाखो भाविकांनी श्री क्षेत्र भगवानगडावर येऊन आपली श्रद्धा अभिव्यक्त केली. दरवर्षी आषाढी एकादशीच्या फराळाचे अन्नदान भारजवाडी ग्रामस्थ तर कार्तिकी एकादशीच्या फराळाचे अन्नदान घोगस पारगांव ग्रामस्थ करतात. यावर्षी शंभर क्विंटल फराळाचे अन्नदान करण्यात आले.

# विठ्ठल नामाच्या गजराने गढी गाव दुमदुमले

## जयभवानी विद्यालयाच्या विद्यार्थी वारकऱ्यांची नेत्रदीपक दिंडी

गेवराई / प्रतिनिधी
(दै.महाभारत)

आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर गढी येथील जयभवानी माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य वसंत राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांची भव्यदिव्य दिंडी काढण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी वारकऱ्यांच्या वेशभुषा करुन केलेल्या हरिनामाच्या गजराने गढीगाव दुमदुमले. गावातील विठ्ठल रुक्मिणी मंदिरात विद्यार्थ्यांनी सादर केलेले दिंडी नृत्य, अभंग, गवळणी सादर करुन ग्रामस्थांना मंत्रमुग्ध केले

जयभवानी माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विद्यालयाच्या शिक्षक व विद्यार्थ्यांनी प्राचार्य वसंत राठोड यांच्या नेतृत्वाखाली दिंडी काढली. दिंडीचा समारोपगढी येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिरात झाला. यावेळी सरपंच विष्णुपंत धोंगडे यांनी दिंडीतील विठ्ठल रुक्मिणी



वेशभूषा केलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार केला. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांच्या हरीनामाच्या गजरामध्ये काही वेळ आम्ही हरवून गेलो अशी भावना त्यांनी यावेळी व्यक्त केली.

शाळा ते गढी गाव दरम्यान काढण्यात आलेली ही दिंडी महामार्गावरून गावात पोहोचली. यावेळी ग्रामस्थांनी पुष्प वृष्टी करत, रांगोळी काढून विद्यार्थ्यांचे स्वागत केले. विठ्ठल रुक्मिणी मंदिरात झालेल्या कार्यक्रमात संगीत विभागाचे राजेंद्र काळे आणि त्यांच्या सहकार्यांनी गवळणी आणि भजने सादर केली. यावेळी दिंडी नृत्य आणि फुगड्या खेळून विद्यार्थ्यांनी उपस्थितांचे लक्ष वेधले. यावेळी प्राचार्य वसंत राठोड, सरपंच विष्णुपंत धोंगडे, पर्यवेक्षक हरिभाऊ हाकाळे, सुदाम शेजाळ, माजी सरपंच जालिंदर उगलमुगले उपसरपंच राजु पठाण, सदस्य अमोल ससाणे, सिरसट श्रींचद, उगलमुगले नाथ, कचरु महाराज सिरसट,भागवत नाकाडे, मोरे ज्ञानेश्वर, दातखिळ मामा, रत्नाकर कुलकर्णी, लक्ष्मण मगर, जाधव रामभाऊ, कुलकर्णी पद्माकर, काळे जनार्दन, माजी उपसरपंच ढेरे महेश, अनिल मगर, सिरसट परमेश्वर, मोरे रविंद्र, गोकुळ सिरसट, अंगत उगलमुगले, अनिल चौधार, शाहरुख पठाण, घोंगडे कार्तिक, स्वप्निल सिरसट, काळे बजरंग, अमर जाधव, घोंगडे करण, गायकवाड राम, साळवे तुषार, वायभट राहूल, नाकाडे सौरभ, नाकाडे बाळू, आदित्य भिसे, समर्थ शिंदे, सिरसट संभाजी यांच्यासह शिक्षक सर्वश्री दीपक शिंदे, दादा तळेकर, ओम मोटे, महेंद्र देशमुख, लक्ष्मण डोंगरे, प्रा. सुरेश तळेकर, रा.से.यो. कार्यक्रमाधिकारी प्रा. लगड एस.एस. ग्रामस्थ, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भिलदरी तांडा येथे आरोग्य शिबीर संपन्न

## इंद्रायणी फाऊंडेशनचा उपक्रम

खुलताबाद । बाबासाहेब दांडगे
(दै. महाभारत)

महानायक वसंतराव नाईक साहेबांच्या ११२ व्या जयंती निमित्त इंद्रायणी फाउंडेशन तर्फे भिलदरी तांडा येथे मोफत महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.या महाआरोग्य शिबिरात मोठ्या प्रमाणात नागरिक सहभागी होऊन डोळे तपासणी,महिलांच्या विविध आजारांच उपचार,लहान मुलांची आरोग्य तपासणी व उपचारासह सर्व आजारांचे मोफत उपचारासाठी नागरिकांना विशेष मार्गदर्शन करण्यात आले.लवकरच छत्रपती संभाजीनगर येथे मोतीबिंदू शस्त्रक्रिया पार पडणार आहे.यावेळी मोफत तपासणी करून विविध आजारांचे मोफत औषध वाटप करण्यात आले.या मोफत महाआरोग्य शिबिरासाठी समता फाउंडेशन,जनसेवा




राष्ट्रसेवा फाउंडेशन,लॉयन्स नेत्र रुग्णालय व जे जे प्लस हॉस्पिटल यांचे विशेष सहकार्य लाभले असून या महाआरोग्य शिबिरासाठी ऋषिकेश भरत चव्हाण यांनी अथक परिश्रम घेऊन महाआरोग्य शिबिराचे नियोजन केले होते.यावेळी माजी सरपंच बाबू काका राठोड, माजी सोसायटी व्हाईस चेअरमन प्रेमराज चव्हाण, नंदकिशोर राठोड,संजय ताराचंद चव्हाण, पो पाटील इंदल राठोड, ज्ञानेश्वर राठोड, राजेश चव्हाण, गुलाब बाबा राठोड, दत्ता पाटील, डॉ गौरव पाटील मान्यवर उपस्थित होते.




वडवणी / दत्ता कराड
(दै.महाभारत)

बीड शहरातील नगद नारायण प्लाझा अंबिका चौक पांगरी रोड बीड या ठिकाणी मराठवाडा अभ्यासिकेचा उद्घाटन सोहळा या अभ्यासिकेचे संचालक तथा आदर्श व्यक्तिमत्व केतुरा गावचे विद्यमान सरपंच परमेश्वर तळेकर यांच्या मराठवाडा अभ्यासिकेच्या उद्धघाटन शुभारंभ जिल्ह्याचे कर्तव्यदक्ष जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन सर यांच्या हस्ते संपन्न झाला यावेळी उपस्थित मान्यवर होते. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन सर यांनी स्पर्धा परीक्षा करणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले, यावेळी जिल्हाधिकारी आपल्या भाषणात म्हणाले आहेत की विद्यार्थ्यांमध्ये जिद्द चिकाटी मेहनत घेऊन आपल्या आई वडिलांचे स्वप्न साकार करा व विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा विषयी माहिती सांगितली यावेळी स्पर्धा परीक्षा करणारे विद्यार्थी पालक वर्ग मोठ्या प्रमाणात उपस्थित होते, या कार्यक्रमाचे प्रास्ताविक परमेश्वर तळेकर यांनी केले तर सूत्रसंचालन व आभार युवा पत्रकार अंकुश गवळी यांनी केले, यावेळी विद्यार्थी तरुण पालक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते,

## पृथ्वीराज मधूकर घुंबार्डे यांचे चार्टर्ड अकाऊंट परीक्षेत

# यश संपादन

गेवराई / प्रतिनिधी
(दै.महाभारत)

गेवराई शहरातील प्रसिद्ध व्यापारी श्री मधूकर ज्ञानोबा घुंबार्डे यांचे चिरंजीव पृथ्वीराज मधूकर घुंबार्डे यांनी नुकत्याच झालेल्या चार्टर्ड अकाऊंट च्या फायनल परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे. त्यांच्या या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

भारतातील कठीण मानल्या जाणाऱ्या चार्टर्ड अकाऊंटची परीक्षा तीन टप्प्यांत घेण्यात येते. या तिन्ही टप्प्यातील परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर आर्थिक नोंदी ठेवणे, आर्थिक विवरणपत्रे तयार करणे आणि त्यांचे परीक्षण करणे यासंबंधी अधिकार प्राप्त होतात. इंस्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया द्वारे घेण्यात येणाऱ्या या महत्त्वाच्या परीक्षेमध्ये गेवराई शहरातील प्रसिद्ध असे व्यापारी



श्री. मधूकर ज्ञानोबा घुंबार्डे यांचे चिरंजीव पृथ्वीराज मधूकर घुंबार्डे यांनी यश संपादन केले आहे. त्यांनी मे २०२५ मध्ये दिलेल्या परीक्षेचा नुकताच निकाल लागला असून त्यामध्ये उत्तीर्ण होऊन चार्टर्ड अकाऊंट ची पदवी पूर्ण केली आहे. या गौरव पुर्ण व दैदिप्यमान यशाबद्दल त्यांच्यावर सर्वत्र अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## तुका म्हणे माझे हेचि सर्व सुख, पाहिन श्रीमुख आवडीने

# सानपाड्यात देवशयनी आषाढी एकादशी उत्साहात संपन्न-आ.मंदाताई म्हात्रे

नवी मुंबई / संतोष वाव्हळ
(दै.महाभारत)

देवशयनी आषाढी एकादशी या शुभप्रसंगी आज संपूर्ण महाराष्ट्रभर विठ्ठल नामाच्या गजराने वातावरण भक्तिमय झाले आहे. त्याच अनुषंगाने साई भक्त सेवा मंडळ व साईभक्त महिला फाउंडेशन यांच्यातर्फे सानपाड्यात प्रतिपंढरपूर आषाढी वारी दिंडी सोहळा आयोजित करण्यात आले होते त्यानिमित्त बेलापूर विधानसभा क्षेत्राच्या आमदार मंदाताई म्हात्रे यांनी प्रतिपंढरपूर आषाढी वारी दिंडी सोहळ्यात सहभागी होत विठ्ठल नामाचा गजर करत श्री विठू रायाचे दर्शन घेतले. तसेच सदर दिंडीत सामील होऊन विठू नामाच्या व टाळ मुर्दुंगाच्या गजरात आमदार मंदाताई म्हात्रे म्हात्रे रंगून गेली. संपूर्ण सानपाडा नगरी आज विठू नामाच्या गजरात न्हाऊन गेली होती. त्याच बरोबर विठ्ठल रुक्मिणी, भगवान शंकर, तुकाराम महाराज, स्वामी समर्थ महाराज, वासुदेव तसेच विविध भगवंतांच्या वेशभूषा परिधान करून कलाकार दिंडीत सहभागी झाले होते व वारकऱ्यांची विठू माऊलींच्या प्रति असलेली भक्ती,श्रद्धा याचं मूर्तिमंत उदाहरण आज दिंडीत अनुभवलं गेल्याचे आमदार मंदाताई म्हात्रे यांनी सांगितले. तसेच त्या पुढे म्हणाल्या की, प्रतिपंढरपूर आषाढी वारी दिंडी सोहळ्याचे आयोजन साईभक्त सेवा मंडळ व साई भक्त महिला फाउंडेशनच्या अध्यक्षा सौ. शारदा आमले व भाजपा युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष श्री. पांडुरंग आमले यांच्या सौजन्याने आयोजित केले होते. त्यामुळे सानपाडा वासियांना जणू काय प्रतिपंढरपूरच सानपाड्यात अवतरतेय असे वाटत होते. तसेच विठ्ठल कृपेचा वरदहस्त सर्वांवर सदैव राहो, सर्वांना सुख - समृद्धी व समाधान लाभो, जनसेवेसाठी आणखी बळ लाभो हीच विठ्ठलाच्या चरणी प्रार्थना! आमदार मंदाताई म्हात्रे यांनी केली.

यावेळी आमदार मंदाताई म्हात्रे यांच्या समवेत नाना शिंदे, सुधीर आंग्रे, अविनाश टेंबेकर, वसंत बावकर, वैशालीताई व्हावेकर, मंगलताई वाव्हळ, किशोरीताई जगताप, स्वाती जाधव, विनिता नाईक, राजेंद्र शेडगे, जितेंद्र खानराते, विश्वास कणसे व युवा फाउंडेशन सहकारी साईराज पराडकर, साई काळे तसेच असंख्य वारकरी बांधव उपस्थित होते.

# चनई जिल्हा परिषद सर्कलमध्ये इच्छुकांची चाचपणी सुरु

## सर्वच पक्ष स्वतंत्र लढणार असल्याने उमेदवारात रस्सीखेच

अंबाजोगाई / सालेम पठाण (दै. महाभारत)

येत्या दोन ते तीन महिन्यात जिल्हा परिषद निवडणुका होणार आहेत त्याची प्रक्रिया सुरु झाली असून नगरपालिका निवडणुकीच्या अगोदर जिल्हा परिषदांच्या निवडणुका होणार असल्याने इच्छुक उमेदवार कामाला लागले आहेत. आरक्षण प्रक्रिया पुढील महिन्यात होणार असली तरी आपआपल्या मतदारसंघात जनसामान्यांची आपल्या विषयी काय भावना आहे हे जाणून घेण्यासाठी इच्छुक उमेदवारांनी आपली यंत्रणा कामाला लावली आहे. चनई जिल्हा परिषद सर्कलमधून लढण्यासाठी अनेक इच्छुक उमेदवार आहेत त्यामध्ये राष्ट्रवादी अजित पवार गटाकडून सरपंच बाळासाहेब सोनवणे, माजी उपसभापती तानाजी देशमुख, भाजपकडून माजी जि.प.सदस्य शंकर उबाळे, ॲड.सतिश केंद्रे तर राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून युवा नेते दिपक शिंदे यांचे नाव आघाडीवर आहे. चनई जिल्हा परिषद सर्कलची यावेळची निवडणुक चुरशीची होणार हे स्पष्ट आहे.

तालुक्यामध्ये चनई जिल्हा परिषद सर्कलमध्ये गेल्या वेळी म्हणजे २०१७ साली झालेली निवडणुक अटीतटीची व प्रतिष्ठेची झाली. कारण शंकर उबाळे व दिपक शिंदे यांच्यात जोरदार लढाई दिसून आली. अवघ्या २८२ मतांनी उबाळे यांचा विजय झाला. दिपक शिंदे हे त्यावेळपासून आजपर्यंत फिल्डवर काम करीत आहेत. चनई जिल्हा परिषद सर्कमध्ये प्रामुख्याने मराठा व वंजारा समाज मोठ्या प्रमाणात आहे त्या खालोखाल मुस्लिम व बौध्द आहेत. परंतु विजयासाठी जी निर्णायक आघाडी मिळणार आहे ती आघाडी प्रामुख्याने मराठा आणि वंजारा मतदार देणार आहे. या मतदारसंघातून यावेळी अनेकजण लढण्यासाठी इच्छुक आहेत आणि मोठ्या प्रमाणात बंड होण्याची शक्यता सुद्धा आहे. कारण गेल्या चार वर्षापासून जिल्हा परिषदेची निवडणुक झालेली नाही. शिवाय अनेकांनी गुडघ्याला बाशिंग बांधल्याने आणि मोठ्या प्रमाणात खर्च केल्याने कोणी आता थांबायला तयार नाही. त्यानुषंगाने यावेळची निवडणुक अटीतटीची व प्रतिष्ठेची होणार आहे. उमेदवारी मिळविण्यापासूनच मोठा संघर्ष पाहवयास मिळणार आहे. या ठिकाणी राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा पवार गटाकडून डिघोळअंब्याच्या सरपंच बाळासाहेब सोनवणे यांचे नाव पुढे आले आहे. सरपंच म्हणून त्यांनी गेल्या दहा वर्षात उत्कृष्ट कामगिरी केलेली आहे. शिवाय डिघोळअंबा हे गाव विकासाचे मॉडेल म्हणून पुढे आणले आहे. शिवाय तालुक्यामध्ये व पंचक्रोशीत त्यांचा जनसंपर्क आहे. त्यांना मानणारा वेगळा वर्ग आहे. शिवाय माजी मंत्री आ.धनंजय मुंडे यांचे निकटचे स्नेही आहेत आणि या मतदार संघात मराठा समाज व वंजारा समाज ज्यांचा प्रभाव असल्याने ते विजयी होवू शकतात असा व्होरा अनेकांनी बांधला आहे. त्यामुळे त्यांना उमेदवारी मिळण्याची आशा पल्लवीत झाली आहे. तर दुसरे उमेदवार तानाजी देशमुख यांचेसुद्धा नाव आघाडीवर आहे आणि त्याचा दावा सुद्धा आहे. कारण पंचायत समितीचे उपसभापती म्हणून त्यांनी उत्कृष्ट काम केलेले आहे. एक तरुण चेहरा म्हणून त्याचा लौकिक आहे. भाजपा आणि राष्ट्रवादी यांच्यात त्यांचा चांगला समन्वय आहे. म्हणून त्यांचा दावा प्रभावी मानला जातो आहे. भाजपाकडून प्रामुख्याने जिल्हा परिषद सदस्य शंकर उबाळे यांचे नाव पुढे आले आहे. एक शांत, संयमी चेहरा अध्यात्म आणि सांप्रदायावर पगडा असलेले शंकर उबाळे हे मृदु आणि शांत स्वभावाचे आहेत सरपंच म्हणून व जिल्हा परिषद सदस्य म्हणून उत्कृष्ट काम त्यांच्या हातून झालेले आहे ग्रामपंचायतचा कारभार करत असताना त्यांनी पेरे पाटील व पोपटराव पवार यांना आदर्श मानून आपले काम केले आहे. त्यांच्या कार्यकालात सनगाव ग्रामपंचायतीला अनेक पुरस्कार मिळालेले आहेत. जिल्हा परिषद सदस्य म्हणूनसुद्धा उत्कृष्ट काम केलेले आहे. म्हणून सकारात्मक विचार असलेल्या चेहर्याचा विचार भाजपाकडून होवू शकतो व विशेष म्हणजे आ.नमितताई मुंदडा यांचे जवळचे स्नेही म्हणून त्यांची ओळख आहे. तर भाजपाकडूनच माजी पंचायत समिती सदस्य ॲड.सतिश केंद्रे यांचेसुद्धा नाव पुढे येत आहे. पंचायत समिती सदस्य म्हणून उत्कृष्ट कामगिरी केलेली आहे. ना.पंकजाताई मुंडे यांचे निष्ठावंत सैनिक म्हणून ओळख आहे. पंचक्रोशीत त्यांचा प्रभाव आहे. म्हणून सतिश केंद्रे यांचे नाव पुढे आले आहे.या उपरही पक्ष नेतृत्व उबाळे, केंद्रे यांच्याशिवाय वेगळा उमेदवार देवू शकतो अशीही चर्चा या सर्कलमध्ये सुरु आहे ज्यामध्ये उद्योजक प्रदिप ठोंबरे किंवा भूषण ठोंबरे यांचा विचार होवू शकतो. परंतु या सर्व जरतरच्या गोष्टी आहेत. याच सर्कलमधून राष्ट्रवादी शरदचंद्र पवार यांच्याकडून दिपक शिंदे यांचे नाव आघाडीवर आहे आणि त्यांचीच उमेदवारी अंतिम होईल अशी शक्यता आहे. कारण लोकसभा व विधानसभा निवडणुकीत दिपक शिंदे यांचा प्रभाव चांगला राहिलेला आहे. मोठ्या तळमळीने उमेदवार विजयी करण्यासाठी प्रयत्न केलेले आहेत. लोकसभेला चांगले यश मिळाले तर विधानसभेला काटावर ही निवडणुक हारलेली आहे. त्यामुळे दिपक शिंदे यांना या ठिकाणी उमेदवारी मिळणार हे स्पष्ट आहे शिवाय खा.बजरंग सोनवणे यांचे निकटवर्तीय आहेत आणि त्यांचीच उमेदवारी अंतिम होईल असे मानले जाते कारण गेल्या निवडणुकीत अवघ्या २८२ मतांनी पराभूत झालेले आहे त्यामुळे शिंदे यांच्याविषयी सहानुभुती आहे.



कार्यकर्त्यांचा मोठा संचय आहे. त्यामुळे त्यांना विजयाची आशा आहे. एकूणच चनई सर्कलमधून इच्छुक उमेदवारांनी आपआपल्या परिने जनमत जाणून घेण्याचा प्रयत्न चालविला आहे काहींनी एजन्सीच्या माध्यमातून सर्वे सुरु केला आहे तर काहींनी आपल्या सहकारी कार्यकर्त्यांच्या माध्यमातून जनमत जाणून घेण्याचा प्रयत्न केला आहे एकूणच चनई जिल्हा परिषदेची निवडणुक यावेळी अटीतटीची व प्रतिष्ठेची होईल असे दिसते आहे. तर पंचायत समिती गणातून अनेक नावे पुढे आहेत ज्यामध्ये भाजपाकडून भिमराव केंद्रे यांच्या नाव पुढे आहे परंतु यावेळी त्याठिकाणी युवा नेते व सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन अनिल किशनराव केंद्रे यांच्या नावाचा विचार केला जाण्याची शक्यता वर्तविली जात आहे कारण मुंदडा घराण्याशी अनिल केंद्रे व त्यांच्या कुटूंबियांचे सलोख्याचे संबंध आहेत. राष्ट्रवादी अजित पवार गट व शरद पवार गटाकडून इछुक उमेदवार पुढे आलेले नाहीत. येणार्या काळात अनेक इच्छुक उमेदवार पुढे येतील.




## आषाढी एकादशी व वाढदिवसाचे औचित्य साधत राशिवडेत फराळ वाटप

कुडूत्री / प्रतिनिधी
दै.महाभारत)

राशिवडे बुद्रुक ता. राधानगरी येथील विठ्ठल- रुक्मिणी मंदिरामध्ये आषाढी एकादशी निमित्य नामदार प्रकाशराव आबिटकर, नेताजी सारंग, उत्तम पाडळकर , योगेश टिपुगडे यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने भाविक भक्तांना व वक्रतुंड इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांना फराळ वाटप कार्यक्रम संपन्न झाला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच संजीवनी पाटील होत्या.फराळ वाटप कार्यक्रम विक्रमसिंह आबिटकर,नेताजी सारंग, श्रीकांत नकाते यांच्या हस्ते संपन्न झाले.यावेळी एकनाथ चौगले, अशोक पाटील, संजय डकरे,निवास डकरे, प्रकाश धुंदरे, हरिभाऊ मगदूम, सुनिल तवटे, राम चौगले, गोपाळ व्हानाळकर, सुनील टिपुगडे, सुमित गायकवाड, विनायक कुंभार,आनंदा चोगले, मंदाकिनी पाटील,ज्योती पाटील,प्रशांत शिंदे, सुनील पाटील, बाबासाहेब गोंगाणे, संतोष चौगले उपस्थित होते. स्वागत प्रास्ताविक आनंदा शिंदे यांनी केले. तर आभार दिलीप गो.पाटील यांनी मानले.

### येवला मुक्तीभुमीवरील अतिक्रमण तात्काळ हटवून सुरू असलेले तार कंपाऊंडचे काम बंद करून

## मजुर असलेले वालकंपाऊंड (संरक्षण भिंत)व तोरण गेट उभारा अन्यथा तीव्र आंदोलन

नाशिक / शांतारामभाऊ दुनबळे
(दै महाभारत)

नाशिक-: येवला येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी १९३५ साली बहिष्कृत वर्गाची सभा घेऊन धर्मांतराची ऐतिहासिक घोषणा केली होती तेव्हापासून येवला मुक्तीभुमी या नावाने देशभरात ओळख निर्माण झाली दर वर्षी लाखो अनुयायी मुक्तीभुमीवर येत असतात व महामानवास विनम्र अभिवादन करतात

मुक्तीभुमीचा विकास नागपुरच्या दिक्षा भूमी सारखा झाला पाहीजे म्हणून येवल्यातील आंबेडकरी चळवळीतील अनेक जेष्ठ नेत्यांनी प्रयत्न करून तत्कालीन सामाजिक न्याय मंत्री मा.चंद्रकांत हंडारे साहेब व मा.छगनरावजी भुजबळ साहेबांच्या पुढाकाराने येवला मुक्तीभुमी भव्य दिव्य स्वरूपात दिसत आहे त्यात टप्पा क्रमांक १व टप्पा क्रमांक २ पूर्णत्वास येत आहे

टप्पा क्रमांक २ चे काम चालू केल्यानंतर जागेचे मोजमाप करण्यात आले होते व चोहोबाजूंनी वालकंपाऊंट मंजूर केले होते कोटाच्या पाठीमागून जात असणारा बायपास रस्ता हा मुक्तीभुमीवरील जागेतून अतिक्रमित आहे सार्वजनिक बांधकाम विभागाचे उप अभियंता मा.उमेश



पाटील साहेब यांनी सदरच्या जागेचे मोजमाप केले त्यावेळेस आम्ही तिथेच होतो सदरचा रस्ता हा त्याच्या मुळ जागेतून घेण्याचे ठरले होते परंतु अध्याप तसे झालेच नाही

सध्या मुक्तीभुमीवर वालकंपाऊंड ऐवजी तार कंपाऊंड चे काम चालू आहे बायपास रोडच्या बाजुने दोन तोरण गेट तयार होणार होते व ते मजुरही होते परंतु ते न करता तार कंपाऊंड चालू आहे उत्तर बाजुने संरक्षण भिंत असणे अतीशय गरजेचे आहे अतिक्रमण न हटविल्यामुळे जवळपास १०ह्न५५०फुट जागा मुक्तीभुमीची कमी झाली आहे टप्पा क्रमांक २साठी जर अंदाजे १५कोटी रूपये मंजूर करण्यात आले होते तर तोरण गेट व वालकंपाऊंड ऐवजी तार कंपाऊंड का? असा मोठा प्रश्न निर्माण निर्माण झाला आहे त्यात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याचे उघड दिसून येत आहे म्हणून आंबेडकरी समाज वतीनेआमची मागणी आहे कि उत्तर बाजूचे असणारे अतिक्रमण हे ताबडतोब हटवून तिथे तार कंपाऊंड न करता मजुंर असलेले वालकंपाऊंड (संरक्षण भिंत)व तोरण गेट उभारण्यात यावे मुक्तीभुमीची ऐतिहासिक जागा असून देखील ज्या आधिकार्याने हा फेरबदल केला त्यावर अनुसूचित जाती जमाती प्रतिबंधक कायद्यानुसार ॲट्रोसिटी अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात यावा व तार कंपाऊंड साठी केलला खर्च हा वसुल करून घ्यावा तहसिलदार साहेब आपण मुक्तीभुमी स्मारकाच्या शासकीय कमिटीवर आहात म्हणून आपण ताबडतोब लक्ष घालून योग्य ती चौकशी करून मुक्तीभुमीच्या जागेवरील अतिक्रमण हटवून व संबधित बांधकाम विभागांच्या आधिकार्यावर गुन्हा दाखल करून मंजुरी प्रमाणे वालकंपाऊंड व तोरण गेट तयार करण्याचे आदेश द्यावे व मला लेखी स्वरूपात ८ दिवसात कळविण्यात यावे अन्यथा मी स्वाभिमानी रिपब्लिकन पक्षाच्या वतिने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा स्वाभिमानी रिपब्लिकन पक्षाचे नाशिक जिल्हाध्यक्ष महेंद्र पगारे यांनी नायब तहसीलदार पंकज नेवसे यांना लेखी निवेदनाद्वारे दिला आहे

निवेदनावर महेंद्र पगारे(स्वारीप नाशिक जिल्हाध्यक्ष तथा चेअरमन)विजय घोडेराव (तालुकाध्यक्ष येवला)बाळासाहेब आहिरे(ता.कार्याध्यक्ष)विनोद त्रिभुवन (ता.उपाध्यक्ष)सुरेश खळे (सल्लागार)मयुर सोनवने (युवा तालुकाध्यक्ष)आकाश घोडेराव (शहर उपाध्यक्ष)दत्तू वाघ (जेष्ठ नेते)प्रशांत वाघ (संघटक)प्रवीण साबळे नितीन पगारे यादी पदाधिकाऱ्यांच्या निवेदनावर सह्या आहेत

## आरोग्याची वारी घरोघरी पोहोचवावी - पालकमंत्री प्रकाश आबिटकर

### आरोग्याची वारी,पंढरीच्या दारी उपक्रमाचा दिंडी सोहळा उत्साहात संपन्न,आरोग्याची वारी घरोघरी पोहोचवावी – कोल्हापूर पालकमंत्री प्रकाश आबिटकर

कोल्हापूर/प्रकाश कांबरे
(दै.महाभारत)

कोल्हापूर : आरोग्याचे महत्त्व सर्वांना कळण्यासाठी प्रत्येक आरोग्य कर्मचाऱ्यांनी आरोग्याची वारी घरोघरी पोहोचवावी, असे प्रतिपादन सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री तथा पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी केले. आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, कोल्हापूर येथे 'आरोग्याची वारी, पंढरीच्या दारी' या उपक्रमांतर्गत भव्य आरोग्य दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. 'जपुया वारसा संस्कृतीचा, घेऊया आनंद आरोग्य वारीचा' हा ध्यास घेऊन आयोजित कार्यक्रमात भक्तिगीत गायनाचा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. यावेळी पालकमंत्री प्रकाश आबिटकर म्हणाले, अधिकारी- कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी प्रशिक्षण केंद्र अद्ययावत करण्यात यावेत,



त्याचबरोबर त्यांच्या गरजा ओळखून, गरजेवर आधारित प्रशिक्षण देण्यावर भर देण्याची सूचनाही त्यांनी केल्या. यावेळी पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते आरोग्य सेवक, लिपिक सेवांतर्गत परीक्षा प्रमाणपत्र वितरण सोहळा पार पडला.

यावेळी दिंडीमध्ये सहभागी झालेल्या कर्मचाऱ्यांनी वारीचा आनंद घेत डेंग्यू व टीबी यांसारख्या विषयांवर पथनाट्ये सादर केली. महिला अधिकारी व कर्मचाऱ्यांनी पारंपरिक संस्कृतीचा वारसा जपत आरोग्याच्या ओव्या गायल्या. झिम्मा, फुगडी, रिंगण सोहळ्यांमध्ये आरोग्य शिक्षण देणारे फलक झळकावत जनजागृती केली. प्राचार्य डॉ. योगेश साळे यांनी दिंडीमध्ये विविध अभंग रचनांचे गायन केले, तसेच प्रास्ताविकेत कार्यक्रमाची रूपरेषा विशद केली. उपस्थितांचे स्वागतही त्यांनी केले. कार्यक्रमाचे नियोजन वैद्यकीय अधिकारी डॉ. विनायक भोई आणि आरोग्य शिक्षण विस्तार अधिकारी शकिला गोरवाडे यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी श्री. खोत (पर्यवेक्षक) आणि श्री. देशमुख यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## आ.मुनगंटीवार यांची लुटारू खत कंपनी विरुद्ध पोलिसात तक्रार

### प्रसंगी जनांदोलन उभारू-आ.मुनगंटीवार

चंद्रपूर (नरेंद्र सोनारकर)

शेतकऱ्यांना रासायनिक खत पुरवठा करताना जबरदस्तीने इतर वस्तू विकत घेण्यास भाग पाडणाऱ्या खत पुरवठा कंपनी विरुद्ध कायदेशीर लढा उभारुन राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री,आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी आज दि. ५ जुलै २०२५ रोजी दुपारी ३.३० वा. बल्लारपूर पोलीस ठाण्यात प्रकरणी अधिकृत तक्रार दाखल केली आहे.पोलीस या संबंधाने काय कार्यवाही करतात,याकडे जिल्हा वासियांचे लक्ष लागले आहे.

शेतीसाठी अत्यावश्यक असलेले रासायनिक खत कोरोमंडल इंटरनॅशनल लिमिटेड या नामांकित कंपनीकडून वितरित केले जाते. मात्र, या खतांच्या वितरणासोबत अन्य वस्तूंची 'लिंकिंग' करून चिल्लर विक्रेत्यांवर जबरदस्ती केली जाते. याचा थेट फटका शेतकऱ्यांना बसतो,



कारण त्यांना ही अनावश्यक उत्पादने खरेदी करूनच खत मिळते. परिणामी, शेतकऱ्यांच्या आर्थिक शोषणाची स्थिती निर्माण झाली असून, या प्रकारांमुळे शेतकऱ्यांचे होणारे नुकसान लक्षात घेता, आ. सुधीर मुनगंटीवार यांनी शेतकऱ्यांची होणारी लुट लक्षात घेता बल्लारपूर पोलिसांत तक्रार दाखल केली आहे.

या पावसाळी अधिवेशनात आमदार मुनगंटीवार यांनी जनहिताचे अनेक मुद्दे लावून धरलेत.प्रसंगी सत्ताधारी आमदार असतांनाही त्यांनी आपल्यास सरकार विरोधात अक्षरशः एल्गार पुकारला होता.अनेक घोटाळे सभागृहाच्या लक्षात आणून दिले होते.दरम्यान मुनगंटीवार यांनी कोरोमल इंटरनेशनल खत कम्पनी विरोधात दाखल केलेली तक्रार अनेक राजकीय पैलूने महत्वाची समजली जात असून,या कंपनी विरोधात तक्रार केल्यानंतर कार्यवाही झाली नाही तर विधानसभेत या बाबत मुद्दा उचलणार असल्याचे त्यांनी पत्रकारांना सांगितले.यात महत्वाची बाब म्हणजे विधानसभेत आवाज उठविल्या नंतरही शेतकऱ्यांची आर्थिक हाणी करणाऱ्या या खत कंपनी विरुद्ध कार्यवाही झाली नाही तर उपोषणाचा मार्ग अवलंब करू,असे सूचक विधानही मुनगंटीवार यांनी केले.ते बल्लारपूर येथील विश्राम गृहात पत्रपरिषदेला सबोधित करत होते.

शेतकऱ्यांच्या प्रश्नावर थेट आपल्याच सरकारच्या विरोधात आवाज बुलंद करणाऱ्या मुनगंटीवार यांनी खत कंपनी विरुद्ध घेतलेला आक्रमक पवित्रा भविष्यात राजकीय दृष्टिकोनातून अनेक उलथापालथ घडणवार का?असा प्रश्न मात्र राजकीय पटलावर उपस्थित झाला आहे.

# जिल्ह्यासह नाशकात पावसाची रिमझिम, जनजीवन विस्कळीत, गोदावरी खळाळली, दुतोंड्या मारुतीच्या कमरेला पाणी


नाशिक / शांतारामभाऊ दुनबळे
(दै महाभारत)

नाशिक -: शहरांसह जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात काल पासून पावसाने मुक्काम ठोकला. शहरात २०.४ मिलीमिटर पावसाची नोंद आली. पावसाचा जोर एवढा होता की, रस्त्यांना नाल्याचे स्वरुप आले होते. दिवसभर सूर्यदर्शनही झालेले नाही. या पावसामुळे अतराव्या दिवशी ही गोदावरी दुथडी भरुन वाहत आहे.शनिवारी सकाळपासून पावसाची रिपरिप सुरु होती. गंगापूर, दारणा, नांदूरमध्यमेश्वर धरणातून विसर्गही वाढवण्यात आलेला होता. धरणाच्या पाणलोट क्षेत्रामध्ये होणाऱ्या सततच्या पावसामुळे धरणामधला विसर्ग ही वाढण्याची शक्यता आहे.

सध्या गोदाकाठचे आजूबाजूचे रस्ते आणि छोटे पूल याना पाणी लागले आहे. पाण्याचा विसर्ग जर वाढला तर हे सर्व पूल आणि आजूबाजूचे मंदिरेही पाण्याखाली जाण्याची शक्यता आहे. दुतोंड्या मारुतीच्या कमरेला पाण्याने स्पर्श केला आहे. सध्या परिस्थिती पूर्णपणे नियंत्रणामध्ये आहे. धार्मिक विधी परंपरेप्रमाणे काठाच्या थोडे दूरच होत आहे. परंतु जर पावसाचा जोर वाढला, आणि धरणाच्या क्षेत्रामधला पाऊस वाढला आणि धरणामधून पाण्याचा विसर्ग करण्याची वेळ आलीच तर मात्र येथील धार्मिक विधी, व्यावसायिकांना इतरत्र हलवले जाऊ शकेल. पावसामुळे जनजीवनावर मोठ्या प्रमाणावर परिणाम झाला असून बाजारपेठेतील गर्दी कमी झाली आहे. शनिवार व रविवार असल्याने चाकरमान्यांनी घरीच राहणे पसंत केले. पाऊस असाच सुरु राहिल्यास भाजीपाल्याची आवक कमी होऊ शकते.

रस्ते जलमय, वाहतूक ठप्प, खरीप हंगामावरही संकटाचे सावट होण्याची दाट शक्यता आहे मे महिन्याच्या प्रारंभापासून सुरू झालेल्या पावसाने जुलैमध्येही आपली संततधार कायम ठेवत शहरातील जनजीवन विस्कळीत केले आहे.

दिवसभर सरीवर सरी कोसळत राहिल्या. परिणामी नागरिकांना घराबाहेर पडणेही मुश्किल झाले. रस्त्यावर साचलेल्या पाण्यामुळे वाहतुकीवर मोठा परिणाम झाला असून वाहनचालकांची कसरत सुरू आहे. अनेक



ठिकाणी रस्त्यांवरील खड्यांमध्ये पाणी साचल्यामुळे खड्डे न दिसता दुचाकीस्वारांचा अपघात होण्याचे प्रमाण वाढले आहे. नाले आणि गठारे ओसंडून वाहत असून काही भागांमध्ये सांडपाण्याचे साचलेले लोट नागरिकांच्या घरांपर्यंत पोहोचत आहेत.

दरम्यान, वेळेआधी सुरू झालेल्या पावसामुळे खरीप हंगामही धोक्यात आला आहे. जूनमध्ये होणाऱ्या पेरण्या सलग पावसामुळे खोळंबल्या असून जमिनीत योग्य वापसा अभावी शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. सोयाबीन, मका, भुईमूग, मूग व उडीद आदी पिकांच्या पेरण्या अजूनही रखडल्या असून पावसाने काही दिवस तरी उघडीप दिली नाही, तर यंदाचा खरीप हंगाम वाया जाण्याचा धोका निर्माण झाला आहे. शेतकऱ्यांमध्ये अस्वस्थता आणि चिंता आहे. आता काही दिवस तरी पावसाने विश्रांती घ्यावी, अशी आशा नागरिक व शेतकरीवर्गातून चिंता व्यक्त केली जात आहे.गोदावरी नदीला पुराची परिस्थितीचा विचार करून मनपाच्या पंचवटी विभागीयअधिकारी मदन हरिश्चंद्र, सहा अधिक्षक मंगेश वाघ, राष्टीय फेरीवाला धोरण विभागाचे सहा, अधीक्षक राजेश सोनवणे, प्रकाश उखाडे ईश्वर शेंडके, रवी शिंदे, अधिशमन दलाचे संजय कानडे आदींनी रामकुंड ते तपोवन संगम पर्यंत पाहणी करून आवश्यक सुचना दिल्या आहेत. यावेळी सध्या होत असलेल्या जोरदार पाऊस आणि यापुढे जोरदार पाऊस होऊन महापुराची परिस्थिती लक्षात घेऊन नदीच्या काठावर तंबूपाल टाकून बसलेल्या लोकांना हलविण्यात येत आहे. याशिवाय लहानमोठ्या व्यावसायिकांना हलवून सतर्कतेचा इशारा आवश्यक सूचना दिल्या जात आहे. यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय अंतर्गत जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कक्ष, मनपा आपत्ती व्यवस्थापन विभाग